मासिक

# शिक्षणयात्री


- वर्ष: ८ वे
- जुलै २०२३
- अंक:७ वा
- किंमत: ३० रुपये


## गुण उधळले

# नकोय कुणालाही आता हे महायुध्द

हे युद्ध थांबले पाहिजे
असे कितीदा मी बोललो आहे.

मी आणि माझ्या कवितेनंही
विनंती केलीय जगातल्या
युद्धखोर सम्राटांना

अजून काय करायला हवे
म्हणजे सारे जग नांदेल
गुण्या गोविंदानं
शांततेनं...
जगातील
निरपराध
माणसांना
संपवण्याचा
जीवे मारण्याचा अधिकार
कुणी दिलाय या आदमखोरांना

बुद्ध अस्वस्थ आहेत
बुद्धाच्याही देशात

जक्षाला प्रश्न
सतावतो आहे
युद्ध की बुद्ध ?

जगात जरी ऐकू येतेय...

बुद्धम् सरणम् गच्छामि
धम्मम् सरणम् गच्छामि
संघम् सरणंम् गच्छामि

तरीही सज्ज होताहेत
अणुबॉम्ब,हायड्रोजनबॉम्ब
आणि न्युक्लियर बॉम्ब

जगात बाजारपेठच भरलीय
शस्त्रास्त्रांची खरेदी-विक्रीची

माझाही देशही गुंतलाय
या खरेदीच्या व्यापारात
जगातले सारे धर्मगुरु

अलीकडे खूप परेशान आहेत
विनाशाच्या उबंरठ्यावर
येऊन ठेपलेय जग सारे

आता एकच आशा आहेय
कधीतरी तारतीलच जक्षाला
फक्त बोधिसत्व...

थांबेल थांबेलच
जगातले युद्ध
खरं तर नकोय

कुणालाही आता हे महायुद्ध
जगाला हवाय फक्त बुद्ध!

**शशिकांत हिंगोणेकर**
जळगांव
९६९९०५९७०७

# अंतरंग


**गुण उधळले**
डॉ.विजय पांढरीपांडे /३

**देऊया भावनिक आधार**
रेणू दांडेकर/५

**अपेक्षांचे ओझे लादू नका मुलांवर**
बी.एन.चौधरी/७

**बालकाच्या मनावर स्पर्धेचे ओझे**
किरण डोंगरदिवे/१०

**लेकरांचे शिक्षण कधी थांबतं का?**
युवराज माने/१२

**कालाय तस्मै नम:**
एम.के.भामरे/१५

**उपक्रमांची रेलचेल!**
दिप्ती काळे/१७

**विठ्ठलाचे झाड**
सुदाम विश्वे/ १९

**असे गुरु असा अनुभव**
उज्वल कुलकर्णी /२०

**विद्यार्थी आत्महत्या**
सुनिल पाटील/२२

**फ्रिगेट बर्ड**
नंदा हरम/२५

**भारताची जनगणना**
संदेश हजारे/२७



मार्गदर्शक
मा.पुरूषोत्तम भापकर (भाप्रसे)

मानद संपादक
सुभाषदादा कुलकर्णी

उप संपादक
संदेश नंदकिशोर हजारे

संपादन सहाय्य
विजय गायकवाड
युवराज माने
डॉ.युवराज पवार

अंक जुळणी
प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे

मुद्रितशोधन
डॉ.युवराज पवार

मुखपृष्ठ
साभार आंतरजाल

कार्यालय प्रमुख
जगदीश पाटील

समृद्ध शिक्षण संस्कारासाठी ...

मासिक **शिक्षणयात्री**

॥ ज्ञानम् सर्वजण हिताय ॥

वर्ष : ७ वे अंक: ७ वा जुलै २०२३

**वार्षिक:रू.४००/-** **द्वैवार्षिक:रू.७००/-** **त्रैवार्षिक:रू.१०००/-**

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.
**Online** पेमेंट साठी - खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri
बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No.13320200000322
IFSC Code : BARB0SHIRPU
वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे
संपर्क पत्ता-
संपादक शिक्षण यात्री
शैलनंद,प्लॉट नं.५२ शिवपार्वती कॉलनी करवंद नाका,मु.पो.ता.-शिरपूर जि-धुळे ४२५४०५
(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)



लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत.

## संवाद



*सुभाषदादा कुलकर्णी*
*संपादक*

खरोखरच आश्चर्य वाटावे,खंत वाटावी कि चिंता वाटावी असा निकाल (दहावी/बारावी) सध्या पहायला मिळतोय.निकालाच्या दुसऱ्या दिवशीचे वृत्तपत्रात १००% गुण मिळल्याच्या बातम्या वाचून मन सुन्न होते.१०० पैकी १०० गुण? असा निकाल असू शकतो? यावर विश्वास बसतच नाही. कारण विश्वास न बसायला काही बाबी कारणीभूत आहेत.

सध्या शालेय अभ्यासक्रम,परिक्षा पेपरची रचना पाहता १०० % गुणांवर साशंकता येते.प्रात्यक्षिकाच्या (२० गुणांपैकी) नावाखाली पैकीच्या पैकी गुण मिळतात.म्हणजे प्रात्यक्षिकात २० पैकी २० गुण दिले जातात.त्यामागे शिक्षकांना आपल्या विषयाचा,आपल्या शाळेच्या निकालाची चिंता असते विद्यार्थ्यांची बिलकुल नाही? तो कसाही असो पण प्रात्यक्षिकाचे हातचे गुण दिल्यानंतर उरला प्रश्ना ८० गुणांचा. प्रत्यक्ष परीक्षावेळी कॉंप्याचा महापूर पाहायला मिळतो.किंवा परिक्षा केंद्रा बाहेर वातावरण स्ट्रीक्ट दिसत असले तरी आतून गोंधळ चालूच असतो.अभ्यास करणाऱ्या हुशार मुलांनाही कॉंपीचा मोह आवरत नाही. तेही इतरांबरोबर वाम मार्ग पत्करतात.मनाने लिहले की पाहून असं कुणालाही विचारलं तरी हसतमुखाने सरळधोपट कॉंपी चा राजमार्ग सांगितला जातो.अशा बिनधास्त वातावरणात ८० पैकी ४० ते ५० गुण सरासरी हुशारी असणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळतातच आणि अति हुशार विद्यार्थी असला की, ९०-१०० च्या सेतू पार कळतोच अर्थात सगळेच हुशार विद्यार्थ्यांना यात गोवणे योग्य ठरणार नाही.त्यांना अपवाद समजावा.

दहावी निकाला नंतर पुढे अकरावी बारावी प्रवेशावेळी डोळे पांढरे व्हायची वेळ येते कारण विज्ञान शाखेकडे वळणाऱ्यांची संख्या व गुणवत्ता पाहता पुढे कसे होणार याची चिंता वाटते.

आणि बारावी निकालानंतर JEE-NEET प्रवेश परिक्षांमध्ये तर विषयच संपतो. इथे गुणवत्ता कळते दहावी बारावी गुणांच्या तुलनेत हुशारीचे सातत्य टिकले नसल्याचे दिसते.म्हणून गुणांचा फुगवटा नक्कीच असावा या शंकेला बळ मिळते.मग विद्यार्थ्यांमध्ये न्यूनंगड निर्माण होवून विद्यार्थी अविचाराच्या गरतेत फसतो.जर दहावी बारावीच खरं रुप कळालं असतं तर फाजील आत्मविश्वासाने विद्यार्थी भटकला नसता.म्हणून शासनाचे धोरण वगैरे जाऊद्या पण पालक आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांची खरं रुप खरी क्षमता समजून द्यायला हवी.नाही तर काही खरे नाही.

वास्तव

# गुण उधळले...




**विजय पांढरीपांडे**

हैदराबाद


आधीच कोरोनाच्या काळजीमुळे झोप नीट येत नाहीय. त्यात नुकतेच दहावी, बारावी ये निकाल जाहीर झालेत. त्या निकालाची एकूण टक्केवारी, हजारो विद्यार्थ्यांना लाभलेली ९० टक्क्यांवरची उधळण, शेकडो विद्यार्थ्यांना मिळालेले शत प्रतिशत गुण, हे सगळे वाचून, ऐकून झोपच उडाली नाहीतर डोळे पांढरे व्हायची वेळ! पाल्य वाईट वागला की हे कसले गुण उधळतोय असे आपण म्हणतो वैतागून इथे तर शिक्षक,परीक्षक,सरकार,बोर्ड, ह्या साऱ्यांनी मिळून अक्षरश गुण उधळले! उत्तीर्ण झालेल्या ची संख्या जी काही वर्षापूर्वी दशकांपूर्वी जास्तीत जास्त सत्तर टक्के किंवा आसपास असायची, ती देखील टक्केवारी ९०-९५ टक्के पर्यंत पोहोचली. यंदा फक्त कोविड चेच आकडे वाढत नाहीत तर विद्यार्थ्यांच्या गुणांच्या आकड्यांनी कोविड महामारीला देखील मागे टाकले! काही मोजक्या विदयार्थ्यांना सर्व विषयात ३५ टक्के म्हणजे उत्तीर्ण होण्यास आवश्यक तेवढेच गुण मिळाले आहेत. शंभर टक्के जसे आश्चर्य तसेच हे पस्तीस टक्के देखील आश्चर्यच. पण ज्यांना मॉडेरेशन म्हणजे काय हे आतले गुपित माहिती आहे, त्यांना या शंभर टक्क्याचे, पस्तीस टक्क्याचे आश्चर्य वाटणार नाही. त्यांना ते छुपे गौडबंगाल निश्चितच माहिती असते. मध्यंतरी एका विद्यापीठाने गुण पत्रिकेवर कोविड बॅच असा उल्लेख केला तेव्हा बरीच टीका, चर्चा झाली होती. खरे तर असे कोविड बॅच वगैरे लिहिण्याची गरज नाही. गुण पत्रिकेवरचे २०२० साल हेच बोलके ठरणार आहे.या अनावश्यक गुणांच्या उधळपट्टी ने नेमके काय साधले जाते? शिक्षणात खूप प्रगती होतेय, विद्यार्थ्यांची, शिक्षकाची, शाळांची गुणवत्ता वाढलीय, दर्जा वाढलाय हे सांगायला सरकार मोकळे. शिवाय पूर्वी पडल्या चेहऱ्याने खालच्या आवाजात, मुलाचे मार्क्स सांगणारे पालक, आता आपल्या मुला मुलीची टक्केवारी 'गर्व से कहो' च्या आवेशात सांगायला मोकळे! ही टक्केवारी आता ९०-९२ अशी सांगूनही उपयोग नाही. त्यापुढे दशांश चिन्हानंतर दोन तीन आकडे अजून टाकावे लागतील. तरच, उस साड़ी से मेरी साडी कितनी...च्या धर्तीवर त्याच्यापेक्षा माझा बबड्या / माझी बबडी किती वरचढ हे सांगणे सोपे जाईल!ही ९० टक्के सुपर करणारी पीढी खरेच त्या प्रमाणात हुशार आहे का? मला वाटते कुणीतरी माहितीच्या अधिकारात या सर्व शंभर टक्के मिळविणाऱ्या विद्यार्थी रत्नाच्या उत्तर पत्रिका जाहीर करण्याचा आग्रह धरला पाहिजे. या सर्व विद्यार्थ्यांच्या सर्व विषयांच्या उत्तर पत्रिकाच्या झेरॉक्स प्रती विक्रीसाठी उपलब्ध केल्या पाहिजेत. म्हणजे ज्यांना कमी गुण मिळालेत, त्यांना आपले कुठे, काय, किती चुकले ते नेमके कळेल. तुलनेत मागे राहिलेल्या विद्यार्थ्यांना त्याच्या शिक्षकांनाही या शंभर टक्के मॉडेल उत्तर पत्रिकातून नवे काही शिकता येईल.शंभर टक्क्या मागचा नेमका गुण मंत्र काय, त्याचे नेमके रहस्य काय हे सर्वांना कळेल तरी. शिवाय रटाळ विषयांवर चर्चा सत्र आयोजित करून गोंधळ घालणाऱ्या टी वी वाहिन्यांनी या शंभर टक्के वाल्या विद्यार्थ्यांच्या जाहीर मुलाखती घ्याव्यात. त्यांना वेग वेगळ्या विषयांवर प्रश्न विचारावेत. त्यांच्यातच चर्चा घडवून आणाव्यात. म्हणजे त्यांच्या पेक्षा ज्युनियर असलेल्या विद्यार्थ्यांना शंभर टक्के गुणांचा अर्थ बोध होईल.

आधीच कोरोनाच्या काळजीमुळे झोप नीट येत नाहीय. त्यात नुकतेच दहावी, बारावी ये निकाल जाहीर झालेत. त्या निकालाची एकूण टक्केवारी, हजारो विद्यार्थ्यांना लाभलेली ९० टक्क्यांवरची उधळण, शेकडो विद्यार्थ्यांना मिळालेले शत प्रतिशत गुण, हे सगळे वाचून, ऐकून झोपच उडाली नाहीतर डोळे पांढरे व्हायची वेळ! पाल्य वाईट वागला की हे कसले गुण उधळतोय असे आपण म्हणतो वैतागून इथे तर शिक्षक,परीक्षक,सरकार,बोर्ड, ह्या साऱ्यांनी मिळून अक्षरशः गुण उधळले! उत्तीर्ण झालेल्या ची संख्या जी काही वर्षापूर्वी, दशकांपूर्वी जास्तीत जास्त सत्तर टक्के किंवा आसपास असायची, ती देखील टक्केवारी ९०-९५ टक्के पर्यंत पोहोचली. यंदा फक्त कोविड चेच आकडे वाढत नाहीत तर विद्यार्थ्यांच्या गुणांच्या आकड्यांनी कोविड महामारीला देखील मागे टाकले! काही मोजक्या विदयार्थ्यांना सर्व विषयात ३५ टक्के म्हणजे उत्तीर्ण होण्यास आवश्यक तेवढेच गुण मिळाले आहेत. शंभर टक्के जसे आश्चर्य तसेच हे पस्तीस टक्के देखील आश्चर्यच. पण ज्यांना मॉडेरेशन म्हणजे काय हे आतले गुपित माहिती आहे, त्यांना या शंभर टक्क्याचे, पस्तीस टक्क्याचे आश्चर्य वाटणार नाही. त्यांना ते छुपे गौडबंगाल निश्चितच माहिती असते. मध्यंतरी एका विद्यापीठाने गुण पत्रिकेवर कोविड बॅच असा उल्लेख केला तेव्हा बरीच टीका, चर्चा झाली होती. खरे तर असे कोविड बॅच वगैरे लिहिण्याची गरज नाही. गुण पत्रिकेवरचे २०२० साल हेच बोलके ठरणार आहे.या अनावश्यक गुणांच्या उधळपट्टी ने नेमके काय साधले जाते? शिक्षणात खूप प्रगती होतेय, विद्यार्थ्यांची, शिक्षकाची, शाळांची गुणवत्ता वाढलीय, दर्जा वाढलाय हे सांगायला सरकार मोकळे. शिवाय पूर्वी पडल्या चेहऱ्याने खालच्या आवाजात, मुलाचे मार्क्स सांगणारे पालक, आता आपल्या मुला मुलीची टक्केवारी 'गर्व से कहो' च्या आवेशात सांगायला मोकळे! ही टक्केवारी आता ९०-९२ अशी सांगूनही उपयोग नाही. त्यापुढे दशांश चिन्हानंतर दोन तीन आकडे अजून टाकावे लागतील. तरच, उस साड़ी से मेरी साडी कितनी...च्या धर्तीवर त्याच्यापेक्षा माझा बबड्या / माझी बबडी किती वरचढ हे सांगणे सोपे जाईल!ही ९० टक्के सुपर करणारी पीढी खरेच त्या प्रमाणात हुशार आहे का? मला वाटते कुणीतरी माहितीच्या अधिकारात या सर्व शंभर टक्के मिळविणाऱ्या विद्यार्थी रत्नाच्या उत्तर पत्रिका जाहीर करण्याचा आग्रह धरला पाहिजे. या सर्व विद्यार्थ्यांच्या सर्व विषयांच्या उत्तर पत्रिकाच्या झेरॉक्स प्रती विक्रीसाठी उपलब्ध केल्या पाहिजेत. म्हणजे ज्यांना कमी गुण मिळालेत, त्यांना आपले कुठे, काय, किती चुकले ते नेमके कळेल. तुलनेत मागे राहिलेल्या विद्यार्थ्यांना त्याच्या शिक्षकांनाही या शंभर टक्के मॉडेल उत्तर पत्रिकातून नवे काही शिकता येईल.शंभर टक्क्या मागचा नेमका गुण मंत्र काय, त्याचे नेमके रहस्य काय हे सर्वांना कळेल तरी. शिवाय रटाळ विषयांवर चर्चा सत्र आयोजित करून गोंधळ घालणाऱ्या टी वी वाहिन्यांनी या शंभर टक्के वाल्या विद्यार्थ्यांच्या जाहीर मुलाखती घ्याव्यात. त्यांना वेग वेगळ्या विषयांवर प्रश्न विचारावेत. त्यांच्यातच चर्चा घडवून आणाव्यात. म्हणजे त्यांच्या पेक्षा ज्युनियर असलेल्या विद्यार्थ्यांना शंभर टक्के गुणांचा अर्थ बोध होईल. ज्यांना सतर किंवा कमी टक्के मिळाले त्यांना, त्याच्या पालकांना, ट्युशन मास्तरांना पुढची तयारी करणे सोपे जाईल. ह्या कोविद च्या काळात बरेच शिक्षक, प्राध्यापक, तज्ञ, वेबिनार द्वारे मार्गदर्शन करताहेत.त्याबरोबरच या अतिहुशार विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन वेबिनार आयोजित करावेत.म्हणजे इतरांना सुद्धा चोवीस कॅरेट अस्सल सोने म्हणजे काय ते कळेल.हे काही से उपरोधाने लिहिलेले अनेकांना रुचणार नाही. पण गुणांचे हे उधळले रंग तरुण विद्यार्थ्यासाठी भविष्याच्या दृष्टीने घातक ठरू शकतात म्हणून हा प्रपंच! भाषा विषयात १०० टक्के मिळविणाऱ्याला एखाद्या विषयावर उत्स्फूर्तपणे दहा पंधरा मिनिटे बोलता येते का? विज्ञान गणितात शंभर टक्के मिळविणाऱ्या पैकी किती पुढे ही गुणवत्ता टिकवून ठेवतात त्यातील किती संशोधक गणितज्ञ होतात? पुढे यापैकी किती जण जागतिक पातळीवर मान्यता पावलेले मूलभूत संशोधन करतात. स्वातंत्र्योत्तर काळात एकाही भारतीयाला भारतात केलेल्या संशोधनाबद्दल नोबेल पारितोषिक का नाही मिळाले? या सगळ्या विद्यार्थ्यांचे पुढे कॉलेजात, विद्यापीठात गेल्यावर काय होते? ते जर असेच सातत्याने ९० टक्के मिळवून चमकत असतील तर मग आपल्या देशातील विद्यापीठाचा दर्जा खालावलेला का? जागतिक उच्च शिक्षण स्पर्धेत दर्जा, मानांकन, संशोधन, या बाबतीत आपली

वास्तव

# देऊया भावनिक आधार



रेणू दांडेकर
दापोली

जून महिना आला की शाळा आणि पावसाळा एकदम सुरू होतात. मुलांना सगळी नवलाई दिसते. घरात कंटाळलेली मुलं शाळेत आता सगळे भेटणार म्हणून आनंदात असतात. या सगळ्यात भर पडते ती १० वी व १२ वीच्या निकालाची! मार्च मध्ये परीक्षा संपते. भविष्याचा अंदाज नसतो. मनात भीती असते.प्रवेश कुठे घ्यायचा? कुठे मिळेल केव्हा निकाल लागेल? किती फी भरावी लागेल ? बरेचवेळा याचा ताणही मुलांवर येतो. एकुण काय एक भलं मोठं प्रश्नचिन्ह असतं. हे प्रश्नचिन्ह आत तसं सगळ्या थरातल्या मुलांना पडतं. पूर्वी काही मुलांचं ठरेलंल असायचे आता एस.एस.सी नंतर शिक्षण पुरे.यात मुलींची संख्या खूप होती.आता काळ बदलेला आहे. भविष्याची स्वप्न पडू लागली आहेत. भविष्याचे चित्र रंगवायला सुरूवात होते. शिवाय आता सुक्ष्मपातळीवर (मायक्रो लेवलवर) किती शाखा उपशाखा उपलब्ध झाल्या आहेत. पुढची पिढी तंत्रस्नेही झालीय. गुगल हातात आहे. सर्वच माहिती बटण दाबता येतं. सगळ्या संधी माहीत होतात. आणि निश्‍चित काय करायचा याचं चित्र मुलांच्या मनात आकारास येतं. मी थोडा सकारात्मक विचार मांडतेय (नकारात्मक चित्र रंगवली जातातच) आता निकालही तसा वेळेवर लागतो. वेळेवर जाहीर होतो. पुढे काय? या प्रश्नांचे उत्तर मुलांचे मुलांच्या मनात तयार असतं. काही प्रमाणात आर्थिक प्रश्नही मुलं सोडवू लागली आहेत हे छान आहे.

मला आठवतय काही वर्षापूर्वी (साधारण २०/२२ वर्षापूर्वी) एक पुस्तिका प्रत्येक मुख्याध्यापकाला मिळाली होती. डॉ.श्रीकांत जिचकर यांच्याकडून आलेल्या या पुस्तिकेत १० वी नंतरचे जवळजवळ शंभर अभ्यासक्रम आणि १२ वी नंतरचे तेवढेच (त्याहीपेक्षा जास्त) अभ्यासक्रमांची माहिती पत्त्यांसह दिली गेली. खरं तरं माझ्यासारख्या २५ ते ३० वर्षे नोकरी झालेल्या




मुख्याध्यापकाली माहिती नव्हते. मग मुलांना तरी कशी सांगणार? तेव्हा तर मुलांनी निर्णय घेण्याचा काळही नव्हता.(ग्रामीण भागात) आजही मला वाटतं आयुष्याच्या या महत्त्वाच्या टप्प्यावरं मुलांचा कल, बुद्धीमत्ता, कौटुंबिक परिस्थिती, आर्थिक क्षमता, निर्णय यांच किती भान मुलांना मी दिलं, मी समजून घेतले. त्यामुळे मुलांकडून योग्य निर्णय घेतला जात नसे,पर्यायाने शिकून उपयोग काही नाही, अशी धारणा होत असे.

आज मुलं आमच्या निर्णयावर किती अवलंबून आहेत? हे जसं महत्त्वाचं तस मुलांना स्वची ओळख किती वास्तववादी आहे? हे ही समजून घेणं महत्त्वाचे आहे. परीक्षा पॅटर्न बदल्याने गुणांची खिराफत भरपूर मिळते.

जून महिना आला की शाळा आणि पावसाळा एकदम सुरू होतात. मुलांना सगळी नवलाई दिसते. घरात कंटाळलेली मुलं शाळेत आता सगळे भेटणार म्हणून आनंदात असतात. या सगळ्यात भर पडते ती १० वी व १२ वीच्या निकालाची! मार्च मध्ये परीक्षा संपते. भविष्याचा अंदाज नसतो. मनात भीती असते.प्रवेश कुठे घ्यायचा? कुठे मिळेल केव्हा निकाल लागेल? किती फी भरावी लागेल ? बरेचवेळा याचा ताणही मुलांवर येतो. एकुण काय एक भलं मोठं प्रश्नचिन्ह असतं. हे प्रश्नचिन्ह आत तसं सगळ्या थरातल्या मुलांना पडतं. पूर्वी काही मुलांचं ठरेलंल असायचे आता एस.एस.सी नंतर शिक्षण पुरे.यात मुलींची संख्या खूप होती.आता काळ बदलेला आहे. भविष्याची स्वप्न पडू लागली आहेत. भविष्याचे चित्र रंगवायला सुरूवात होते. शिवाय आता सुक्ष्मपातळीवर (मायक्रो लेवलवर) किती शाखा उपशाखा उपलब्ध झाल्या आहेत. पुढची पिढी तंत्रस्नेही झालीय. गुगल हातात आहे. सर्वच माहिती बटण दाबता येतं. सगळ्या संधी माहीत होतात. आणि निश्चित काय करायचा याचं चित्र मुलांच्या मनात आकारास येतं. मी थोडा सकारात्मक विचार मांडतेय (नकारात्मक चित्र रंगवली जातातच) आता निकालही तसा वेळेवर लागतो. वेळेवर जाहीर होतो. पुढे काय? या प्रश्नांचे उत्तर मुलांचे मुलांच्या मनात तयार असतं. काही प्रमाणात आर्थिक प्रश्नही मुलं सोडवू लागली आहेत हे छान आहे.

मला आठवतय काही वर्षापूर्वी (साधारण २०/२२ वर्षापूर्वी) एक पुस्तिका प्रत्येक मुख्याध्यापकाला मिळाली होती. डॉ.श्रीकांत जिचकर यांच्याकडून आलेल्या या पुस्तिकेत १० वी नंतरचे जवळजवळ शंभर अभ्यासक्रम आणि १२ वी नंतरचे तेवढेच (त्याहीपेक्षा जास्त) अभ्यासक्रमांची माहिती पत्त्यांसह दिली गेली. खरं तरं माझ्यासारख्या २५ ते ३० वर्षे नोकरी झालेल्या मुख्याध्यापकाली माहिती नव्हते. मग मुलांना तरी कशी सांगणार? तेव्हा तर मुलांनी निर्णय घेण्याचा काळही नव्हता.(ग्रामीण भागात) आजही मला वाटतं आयुष्याच्या या महत्त्वाच्या टप्प्यावरं मुलांचा कल, बुद्धीमत्ता, कौटुंबिक परिस्थिती, आर्थिक क्षमता, निर्णय यांच किती भान मुलांना मी दिलं, मी समजून घेतले. त्यामुळे मुलांकडून योग्य निर्णय घेतला जात नसे,पर्यायाने शिकून उपयोग काही नाही, अशी धारणा होत असे.

आज मुलं आमच्या निर्णयावर किती अवलंबून आहेत? हे जसं महत्त्वाचं तस मुलांना स्वची ओळख किती वास्तववादी आहे? हे ही समजून घेणं महत्त्वाचे आहे. परीक्षा पॅटर्न बदल्याने गुणांची खिराफत भरपूर मिळते. निकाल (एकूणच) राज्याचा ९०% पेक्षा जास्त असतो. जवळजवळ सर्व मुलं पास होतात. त्यात ज्या मुलांना भरपूर गुण मिळतात. ती बरेचवेळा १० वी नंतर सायन्स या निर्णयावर ठाम असतात. आणि मग १२ वीच्या निकालानंतर नाराज होतात. बहुतांश मुलांना आपण विज्ञान शाखा निवडून काय करणार हे ही माहित नसते. अनेकवेळा पालकांचाही अभ्यास नसतो आपल्या मुलाला मिळालेले गुण पाहून आनंद होणं पालक म्हणून स्वाभाविक आहे. अशावेळी पालकांचे समुपदेशन करण्याची गरज विसरुन चालणार नाही. मध्यंतरी शासनाने कल चाचण्या घेतल्या पण त्याची गुणवत्ता आणि घेणारे हे एक प्रश्न चिन्ह होतं. कारण पुरेसे मार्गदर्शन आणि घेणाऱ्याची संख्या-मुलांची संख्या यांचे व्यस्त प्रमाण हे ही होते. तसा निर्णय मुलांनी घेतला का हे त्या त्या शाळांना तपासणे शक्य होते. ते घडले का?

या सगळ्याचे मुळ आपण वर्गरचनेच्या विचार कसा करतो याच्याशी आहे. आपला वर्ग ४० ते ६० मुलांचा असतो नी त्या वर्गाचा सगळा मिळून एक चेहरा आपण मानतो. वास्तविक प्रत्येक मुल वेगळे प्रत्येक चेहरा वेगळा पण आपल्या अध्यापनाने कुठे हा प्रत्येक चेहरा कसा वेगळा आहे हे बघितलं जातं का? त्याचं भान मुलांना दिलं जातं का? एका शाळेत मी हे पाहिलं की ९ वी ला शिकवणारे सर्व शिक्षक महिना अखेरीच इतर कामांबरोबर हे ही काम करतात की प्रत्येक मुलाच्या समतांवर, ताकदीवर / बलस्थानांवर चर्चा करतात. नि ते मुलांना जाणवून देत होते. अर्थातच आपल्या बाबत इतकी काळजी घेणारे शिक्षक आणि मुले- शाळा यांचे नाते घट्ट राहिले. मुलांच्या मनावरचा ताण कमी झाला होता. विश्वासही वाढला होता कारण १० वी नंतर काय, १२ वी नंतर काय याविषयी तिथं बोललं जात होतं.

प्रत्येक मुल ही आपल्या देशाची शक्ती आहे. लोकसंख्या ही ताकद व्हायला हवी असेल तर प्रत्येक

वास्तव

# अपेक्षांचे आझे लादू नका मुलांवर



**बी.एन.चौधरी**
धरणगांव-जळगांव

दहावी, बारावी बोर्ड परिक्षांचे निकाल लागले . प्रचंड गुणांची ढगफुटी झाली,जी जीवघेणी असून तिने सर्वत्र धुमाकूळ घातलाय, त्याचा सर्वाधिक फटका बसला, तो शिक्षण क्षेत्राला. आधीच दुर्लक्षित असलेले हे क्षेत्र, पार डबघाईस आले. विद्यार्थी, शाळा आणि शिक्षक हा आकृतीबंध बिघडला. खाजगी क्लासेसमधील शिक्षणाचे पेव फुटले. न परवडणारे कोचिंग, क्लासेस, मोबाईल लॅपटॉप, इतर क्सेसरीजची खरेदी माथ्यावर बसली. हे सव करत असतांना, मुलं वर्गातील हजेरीलाच विसरले आहेत ती केवळ नाममात्र झाली आहे. पालकांची गुणांची, मार्कांची भूक मात्र तशीच्या तशीच आहे. आपली अपूर्ण स्वप्नं मुलांनी पूर्ण करावीत. त्यासाठी भरभरुन गुण मिळवावेत. डॉक्टर, इंजिनिअर बनावं. मोठमोठ्या पदांवर नोकरी करावी, रग्गड पैसा कमवावा, अश्या अपेक्षा ते मुलांकडून व्यक्त करतात. मुलं जणू रेसचे घोडेच आहेत, असं समजून त्यांना ते दामटवतात. हे अपेक्षांचे ओझे मुलांवर लादू नका. ते फुलं आहेत, तुमच्या ओरडण्याने ते कोमेजून जातील. हे कुणीतरी सांगण्याची वेळ येवून ठेपली आहे. विद्यार्थ्यांपेक्षा पालकांसमोर रंगबिरंगी स्वप्नांचं जाळं पसरलं आहे. या जाळ्यात ओढण्यासाठी असंख्य खर्चीक क्लासेस, कोचिंग वर्ग, खाजगी शिकवण्या शिकाऱ्यांसारखी टपून बसली आहेत. त्यातही स्पेशालिटी आहे. राजस्थानचे कोटा. महाराष्ट्रातील लातूर, नांदेड पॅटर्न त्यासाठी प्रसिद्ध आहे. गुणांचं दुष्टचक्र, विद्यार्थ्यांना चरकासारकं पिळून काढतं. स्पर्धा तर जीवघेण्या झाल्या आहेत. हे म्हणजे शिक्षेचे टोकदार सुळे आहेत, हे समजूनही पालक आपल्या लेकरांना, त्यावर बळजबरीने चढवतच आहेत. विद्यार्थ्यांमध्ये भीती निराशेचे लोण पसरले आहे. ते असमंजस, भयभीत आहेत. यश मिळाले नाही तर, पालक, समाज काय म्हणेल ? या भितीने ते चक्क आत्महत्येला सामोरे जातात. ही दुर्लक्षित करावी अशी नाही. यात दोष पालकांचाच आहे असं मला वाटतं. आपल्या मुलाची क्षमता काय आहे.? आवड काय आहे ? याचा विचार न करता, त्याला चक्क सुळावर चढवणारी आजची पालकांची पिढी, स्वार्थी झाली आहे. असेच खेदाने म्हणावे लागेल.

उमलत्या पिढीला तिच्या कलाने, आवडीने, क्षमतेने रुजू द्या. उमलू द्या. फुलू द्या. त्यांचं फुलणं, बहरणं पालक म्हणून आपण फक्त डोळसपणे बघावं. त्याचा आनंद घ्यावा. त्यांची वेसण आपल्या हाती घेवून, त्यांना आपल्याला हवे तसे दामटू नका. यामुळे ते थकतील. हताश होतील. अपयश आलं तर मोडून पडतील. त्यांना त्यांचं त्यांचं चालू द्या. पडू द्या, चाचपडू द्या. सावरु द्या. स्वतःचा मार्ग स्वतःला निवडू द्या. त्याचं छोटं यशही आनंदाने साजरं करा. मोठे पद, मोठी नौकरी म्हणजे सर्वस्व नाही. त्यांना घर, समाज यांची बांधिलकी शिकवा. देशप्रेम शिकवा. बंधूभाव शिकवा. हक्कांची जाणिव करुनच द्या. मात्र, कर्तव्य शिकवायलाही विसरु नका. तुमचं मुल, समाजाला आपलं मुल वाटायला हवं. आणि, त्यालाही समाज आपला वाटावा.

दहावी, बारावी बोर्ड परिक्षांचे निकाल लागले . प्रचंड गुणांची ढगफुटी झाली,जी जीवघेणी असून तिने सर्वत्र धुमाकूळ घातलाय, त्याचा सर्वाधिक फटका बसला, तो शिक्षण क्षेत्राला. आधीच दुर्लक्षित असलेले हे क्षेत्र, पार डबघाईस आले. विद्यार्थी, शाळा आणि शिक्षक हा आकृतीबंध बिघडला. खाजगी क्लासेसमधील शिक्षणाचे पेव फुटले. न परवडणारे कोचिंग, क्लासेस, मोबाईल, लॅपटॉप, इतर क्सेसरीजची खरेदी माथ्यावर बसली. हे सर्व करत असतांना, मुलं वर्गातील हजेरीलाच विसरले आहेत. ती केवळ नाममात्र झाली आहे. पालकांची गुणांची, मार्कांची भूक मात्र तशीच्या तशीच आहे. आपली अपूर्ण स्वप्नं मुलांनी पूर्ण करावीत. त्यासाठी भरभरुन गुण मिळवावेत. डॉक्टर, इंजिनिअर बनावं. मोठमोठ्या पदांवर नोकरी करावी, रग्गड पैसा कमवावा, अश्या अपेक्षा ते मुलांकडून व्यक्त करतात. मुलं जणू रेसचे घोडेच आहेत, असं समजून त्यांना ते दामटवतात. हे अपेक्षांचे ओझे मुलांवर लादू नका. ते फुलं आहेत, तुमच्या ओरडण्याने ते कोमेजून जातील. हे कुणीतरी सांगण्याची वेळ येवून ठेपली आहे. विद्यार्थ्यांपेक्षा पालकांसमोर रंगबिरंगी स्वप्नांचं जाळं पसरलं आहे. या जाळ्यात ओढण्यासाठी असंख्य खर्चीक क्लासेस, कोचिंग वर्ग, खाजगी शिकवण्या शिकाऱ्यांसारखी टपून बसली आहेत. त्यातही स्पेशालिटी आहे. राजस्थानचे कोटा. महाराष्ट्रातील लातूर, नांदेड पॅटर्न त्यासाठी प्रसिद्ध आहे. गुणांचं दुष्टचक्र, विद्यार्थ्यांना चरकासारकं पिळून काढतं. स्पर्धा तर जीवघेण्या झाल्या आहेत. हे म्हणजे शिक्षेचे टोकदार सुळे आहेत, हे समजूनही पालक आपल्या लेकरांना, त्यावर बळजबरीने चढवतच आहेत. विद्यार्थ्यांमध्ये भीती निराशेचे लोण पसरले आहे. ते असमंजस, भयभीत आहेत. यश मिळाले नाही तर, पालक, समाज काय म्हणेल ? या भितीने ते चक्क आत्महत्येला सामोरे जातात. ही दुर्लक्षित करावी अशी नाही. यात दोष पालकांचाच आहे असं मला वाटतं. आपल्या मुलाची क्षमता काय आहे.? आवड काय आहे ? याचा विचार न करता, त्याला चक्क सुळावर चढवणारी आजची पालकांची पिढी, स्वार्थी झाली आहे. असेच खेदाने म्हणावे लागेल.

उमलत्या पिढीला तिच्या कलाने, आवडीने, क्षमतेने रुजू द्या. उमलू द्या. फुलू द्या. त्यांचं फुलणं, बहरणं पालक म्हणून आपण फक्त डोळसपणे बघावं. त्याचा आनंद घ्यावा. त्यांची वेसण आपल्या हाती घेवून, त्यांना आपल्याला हवे तसे दामटू नका. यामुळे ते थकतील. हताश होतील. अपयश आलं तर मोडून पडतील. त्यांना त्यांचं त्यांचं चालू द्या. पडू द्या, चाचपडू द्या. सावरु द्या. स्वतःचा मार्ग स्वतःला निवडू द्या. त्यांचं छोटं यशही आनंदाने साजरं करा. मोठे पद, मोठी नौकरी म्हणजे सर्वस्व नाही. त्यांना घर, समाज यांची बांधिलकी शिकवा. देशप्रेम शिकवा. बंधूभाव शिकवा. हक्कांची जाणिव करुनच द्या. मात्र, कर्तव्य शिकवायलाही विसरु नका. तुमचं मुल, समाजाला आपलं मुल वाटायला हवं. आणि, त्यालाही समाज आपला वाटावा.

मुलांना पैसा, साधनं, सामुग्री, सुखसुविधा दिलेत म्हणजे आपलं कर्तव्य संपलं. अशी काही पालकांची मानसिकता झाली आहे. श्रीमंत, उच्चभ्रूंमध्ये तर हा गैरसमज राजमान्य झालेला आहे. मात्र, नवश्रीमंत, पती-पत्नी दोघं नोकरीला आहेत आणि जिथं आजी आजोबा नाहीत, अश्या घरांमध्येही ह्या प्रवृत्तीने चोर दरवाज्याने प्रवेश केला आहे. यांच्या मतांनुसार मुलं, पाल्य, लेकरं, विद्यार्थी हे मशिन बनले आहेत. त्यात शिकवण्या, पैसा, वस्तू टाकले की दुसरीकडून भरपूर गुण यायलाच हवेत. असा त्यांचा हट्ट असतो. मी असे असंख्य पालक पाहिले आहेत जे आपल्या मुलांनी ९०% गुण मिळवले, तरी खुश नसतात. एक पालक तर ९५% गुण मिळवूनही पहिला नंबर हुकला म्हणून त्याच्या मुलावर डाफरत होता. ९५.५% वाला पहिला आला. तू कां आला नाही.? ही त्याची खंत. ते लेकरु ९५% मार्क्स मिळवूनही गुन्हेगारासारखं, गुडघ्यात तोंड लपवून रडत होतं. आईबापाचं बोलणं खात होतं. फक्त ०.५% गुणांसाठी त्यांनी, मुलाने मेहनतीने मिळवलेल्या ९५% गुणांचं पुरतं मातेरं केलं होतं. त्या मुलाच्या शिक्षक असलेल्या आई वडिलांना, मी त्यांचे दहावीचे गुण विचारले तर ते ५९% आणि ५५% होते. यात दोष कुणाचा ? हे शोधण्याची ही वेळ नाही. उणं दुणं काढण्याचाही हा प्रसंग नाही. अश्या वेळी पालकांनी आपल्या लेकरांच्या पाठी उभं राहणं महत्वाचं असतं. भिऊ नको, मी तुझ्यापाठीशी आहे.!

दहावी, बारावी बोर्ड परिक्षांचे निकाल लागले . प्रचंड गुणांची ढगफुटी झाली,जी जीवघेणी असून तिने सर्वत्र धुमाकूळ घातलाय, त्याचा सर्वाधिक फटका बसला, तो शिक्षण क्षेत्राला. आधीच दुर्लक्षित असलेले हे क्षेत्र, पार डबघाईस आले. विद्यार्थी, शाळा आणि शिक्षक हा आकृतीबंध बिघडला. खाजगी क्लासेसमधील शिक्षणाचे पेव फुटले. न परवडणारे कोचिंग, क्लासेस, मोबाईल, लॅपटॉप, इतर क्सेसरीजची खरेदी माथ्यावर बसली. हे सर्व करत असतांना, मुलं वर्गातील हजेरीलाच विसरले आहेत. ती केवळ नाममात्र झाली आहे. पालकांची गुणांची, मार्कांची भूक मात्र तशीच्या तशीच आहे. आपली अपूर्ण स्वप्नं मुलांनी पूर्ण करावीत. त्यासाठी भरभरुन गुण मिळवावेत. डॉक्टर, इंजिनिअर बनावं. मोठमोठ्या पदांवर नोकरी करावी, रग्गड पैसा कमवावा, अश्या अपेक्षा ते मुलांकडून व्यक्त करतात. मुलं जणू रेसचे घोडेच आहेत, असं समजून त्यांना ते दामटवतात. हे अपेक्षांचे ओझे

## माझी कविता

### पाऊसधारा

नभ काळे भरून आले
विजताई तडतडली
ढगांचे हत्ती नाहत आले
हवा सुसाट पळाली १,

कोसळल्या पाऊसधारा
डोंगरकडे भिजून गेले
झाडांतुन लेझिम वाजे
पानांवर मोती रेंगाळले २,

फांद्या फांद्यावर गोकुळ
प्रीतगाणी गुणगुणती
छम छम पाऊसधारा
बिनधास्त नाच करती ३,

सरींचा स्पर्श भुईला
भागली तृष्णा भेगांची
थुई थुई मयुर नाचे
गाज नवचैतन्याची ४,



**स्वप्ना अमृतकर**
पुणे
९९६०७७२०९३

# बालकाच्या मनावर स्पर्धेचे ओझे



किरण डोंगरदिवे
मेहकर - बुलडाणा

कधी दप्तराचे ओझे पाठीवर घेऊन हातात टिफिन आणि वॉटर बॅग अशा अवतारातल्या गणवेशात शाळेत निघालेल्या स्वतःच्या चिमुल्याकडे मन भरुन पाहिले आहे का? नसेल तर पाहा, त्याचे वय किती अन् त्याचे स्वतः चे वजन किती? त्याच्या दप्तराचे ओझे किती ? खरंच कधी विचार केलाय का? सशासारख्या गोजिरवाण्या दिसणाऱ्या मुलाला आपण त्याच्या बालमनाचा चुराडा करत निष्कारण शर्यतीत तर उतरवले नाही का? मुलांकडून अपेक्षा तरी किती ठेवायच्या? त्याने वर्गात पहिलेच आले पाहिजे. आपला आपल्या शालेय जीवनात किती वेळा पहिला नंबर आला? थोडं आठवा तर खरं... मुलाने जागतिकीकरणाचा विचार करुन जग जिंकावे ही अपेक्षा छानच आहे पण आपण कुवतीपेक्षा जास्त अपेक्षा तर केली नाही ना? असाही विचार आपण केला पाहिजे. कॉन्व्हेंटच्या केजी वर्गात जाणाऱ्या बोबडे बोल बोलणाऱ्या लेकराने जगाची किती माहिती ठेवावी असे आपल्याला वाटते. जिथे त्याला नीट बोलता येत नाही तिथे त्याच्या वह्याच्या पानावर अर्थ न समजणारे Earth, Sun, चेप असे शब्द तो गिरवत असतो पण आपण तिकडे डोळेझाक करतो. एकदा मी माझ्या मुलीला तिच्या शिक्षकांनी आठ पाने गृहपाठ दिला म्हणून तक्रार केली. त्याच वेळी आमच्या मुलाला दिवसभर गुंतून राहील एवढा गृहपाठ द्या असे म्हणणारे पालक मला शिक्षकांनी दाखवले. मुले दिवसभर अभ्यासातच गुंतावी असे आपल्याला का वाटते? यापेक्षा मुलांनी आपल्याशी चार शब्द बोलावे व आपल्याभोवती खेळावे थोडा वेळ तर आई-बापाचे काय नुकसान होईल ते माझ्या आकलनाबाहेर आहे. मुलाने मागितले तो खेळ व्हिडिओ गेम वा इतर कुठलेही खेळणे तुम्ही त्याला उपलब्ध करुन देता मग तो खेळ खेळण्यासाठी त्याला काही वेळ उपलब्ध करुन देणे हे आपलेच कर्तव्य नाही का? मात्र सकाळी उठल्याबरोबर ट्यूशन क्लास त्यानंतर घरी येऊन ट्यूशनचे होमवर्क नंतर अकरा ते पाच शाळा त्यानंतर कुठेतरी एखादी दुसरी ट्यूशन किंवा संगीत क्लास त्यानंतर घरी येऊन संगणकाशी खटपट नंतर शाळेतील गृहपाठ अन् गृहपाठ करतानाच मुकाट झोपलेले निष्पाप जीव पाहून आई-वडिलांचे हृदयात कालवाकालव होत नाही का? बरं सुटीच्या दिवशी साचेबद्ध कार्यक्रम, बाबा रोज ऑफिसला जातात ते सुट्टीच्या दिवशी मुलांना वेळ देतात म्हणजे काय? तर ते मुलांचा अभ्यास घेतात. मोठमोठ्या शहरात सुटीच्या दिवशी मुलांना स्विमिंगक्लास किंवा व्यक्तिमत्त्व विकास वर्गासाठी सक्तीने पाठविणारे माय-बाप मला दिसतात. मुलांच्या वाढदिवसाच्या दिवशी मिळालेले अन् माय-बापाने उपलब्ध करुन दिलेले महागडे खेळणे कोपऱ्यात धूळ खात पडते. मुले गुगल इंटरनेट वापरत जगाशी संवाद साधत आहे मात्र ते सरळसरळ दुर्दैव आहे. भरीसभर म्हणून शाळेत (कॉन्व्हेंट) काही विशिष्ट शाळेत बोलण्याची सक्ती, घरी मराठी संभाषण टीव्ही वर हिंदी कार्यक्रम अन् शाळेत इंग्रजी बोलण्याची सक्ती वय वर्ष पाच-सहा असलेल्या मुलांची दशा काय होत असेल? सकाळी जबरदस्तीने उठून पाणीमिश्रित दुधात बोर्नव्हिटा टाकून पिल्यावर ज्याला ओठावरचे दुधाचे मिशासारखे कौतुक वाटते त्या बालकांच्या मनाचा आपण कधी विचार करणार

कधी दप्तराचे ओझे पाठीवर घेऊन हातात टिफिन आणि वॉटर बॅग अशा अवतारातल्या गणवेशात शाळेत निघालेल्या स्वतःच्या चिमुल्याकडे मन भरुन पाहिले आहे का? नसेल तर पाहा, त्याचे वय किती अन् त्याचे स्वतः चे वजन किती? त्याच्या दप्तराचे ओझे किती ? खरंच कधी विचार केलाय का? सशासारख्या गोजिरवाण्या दिसणाऱ्या मुलाला आपण त्याच्या बालमनाचा चुराडा करत निष्कारण शर्यतीत तर उतरवले नाही का? मुलांकडून अपेक्षा तरी किती ठेवायच्या? त्याने वर्गात पहिलेच आले पाहिजे. आपला आपल्या शालेय जीवनात किती वेळा पहिला नंबर आला? थोडं आठवा तर खरं... मुलाने जागतिकीकरणाचा विचार करुन जग जिंकावे ही अपेक्षा छानच आहे पण आपण कुवतीपेक्षा जास्त अपेक्षा तर केली नाही ना? असाही विचार आपण केला पाहिजे. कॉन्व्हेंटच्या केजी वर्गात जाणाऱ्या बोबडे बोल बोलणाऱ्या लेकराने जगाची किती माहिती ठेवावी असे आपल्याला वाटते. जिथे त्याला नीट बोलता येत नाही तिथे त्याच्या वह्याच्या पानावर अर्थ न समजणारे Earth, Sun, चेप असे शब्द तो गिरवत असतो पण आपण तिकडे डोळेझाक करतो. एकदा मी माझ्या मुलीला तिच्या शिक्षकांनी आठ पाने गृहपाठ दिला म्हणून तक्रार केली. त्याच वेळी आमच्या मुलाला दिवसभर गुंतून राहील एवढा गृहपाठ द्या असे म्हणणारे पालक मला शिक्षकांनी दाखवले. मुले दिवसभर अभ्यासातच गुंतावी असे आपल्याला का वाटते? यापेक्षा मुलांनी आपल्याशी चार शब्द बोलावे व आपल्याभोवती खेळावे थोडा वेळ तर आई-बापाचे काय नुकसान होईल ते माझ्या आकलनाबाहेर आहे. मुलाने मागितले तो खेळ व्हिडिओ गेम वा इतर कुठलेही खेळणे तुम्ही त्याला उपलब्ध करुन देता मग तो खेळ खेळण्यासाठी त्याला काही वेळ उपलब्ध करुन देणे हे आपलेच कर्तव्य नाही का? मात्र सकाळी उठल्याबरोबर ट्यूशन क्लास त्यानंतर घरी येऊन ट्यूशनचे होमवर्क नंतर अकरा ते पाच शाळा त्यानंतर कुठेतरी एखादी दुसरी ट्यूशन किंवा संगीत क्लास त्यानंतर घरी येऊन संगणकाशी खटपट नंतर शाळेतील गृहपाठ अन् गृहपाठ करतानाच मुकाट झोपलेले निष्पाप जीव पाहून आई-वडिलांचे हृदयात कालवाकालव होत नाही का? बरं सुटीच्या दिवशी साचेबद्ध कार्यक्रम, बाबा रोज ऑफिसला जातात ते सुट्टीच्या दिवशी मुलांना वेळ देतात म्हणजे काय? तर ते मुलांचा अभ्यास घेतात. मोठमोठ्या शहरात सुटीच्या दिवशी मुलांना स्विमिंगक्लास किंवा व्यक्तिमत्त्व विकास वर्गासाठी सक्तीने पाठविणारे माय-बाप मला दिसतात. मुलांच्या वाढदिवसाच्या दिवशी मिळालेले अन् माय-बापाने उपलब्ध करुन दिलेले महागडे खेळणे कोपऱ्यात धूळ खात पडते. मुले गुगल इंटरनेट वापरत जगाशी संवाद साधत आहे मात्र ते सरळसरळ दुर्दैव आहे. भरीसभर म्हणून शाळेत (कॉन्व्हेंट) काही विशिष्ट शाळेत बोलण्याची सक्ती, घरी मराठी संभाषण टीव्ही वर हिंदी कार्यक्रम अन् शाळेत इंग्रजी बोलण्याची सक्ती वय वर्ष पाच-सहा असलेल्या मुलांची दशा काय होत असेल? सकाळी जबरदस्तीने उठून पाणीमिश्रित दुधात बोर्नव्हिटा टाकून पिल्यावर ज्याला ओठावरचे दुधाचे मिशासारखे कौतुक वाटते त्या बालकांच्या मनाचा आपण कधी विचार करणार आहोत ?पालकांच्या इच्छा-आकांक्षाचे मुलांच्या दफ्तराला ओझें एकदा एका राजाने स्वतःच्या सैनिकांजवळ लढाईला जाताना तलवार,भाला, धनुष्य आदी सर्व प्रकारची हत्यारे दिली मात्र ते सैनिक त्या हत्याराच्या ओझ्यामुळे काहीच न करता लढाई हरले. अशा आशयाची एक कथा आज मला प्रकर्षाने आठवते. ती शाळेत जाणाऱ्या लहानग्या जीवांकडे पाहून, जेमतेम १५ ते २० किलो वजन असलेल्या ह्या मुलांच्या पाठीवर त्यांच्याच वजनाइतके दफ्तराचे ओझे पाहून आपल्याला सुशिक्षित पिढी घडवायची आहे की त्यांना ओझ्याखाली दाबायचे आहे हेच कळत नाही. आपण जर आज वीस-पंचवीस वर्षे मागे गेलो तर स्वतःच्या दफ्तरातील सहा पुस्तके व सहा १०० पानी वह्या प्रसंगी एका छोट्या डब्यात दुपारचे जेवण याची आठवण होते, मग आज इयत्ता पहिलीच्या मुलांना सतरा ते अठरा पुस्तके त्याच्या स्वतंत्र नोटबुक, छापील कार्यपुस्तिका, क्राफ्ट बॉक्स, टिफिन, शाळा सुटल्यावर ज्युडोच्या प्रॅक्टिससाठी कराटे किट किंवा स्केटिंगच्या सरावासाठी स्केटिंग किट असं किती ओझं आपण आपल्या मुलांवर लादतो आहोत ह्याचा पालकांनी विचार करायला हवा.

शासनाने मुलांच्या दफ्तराचे ओझे किती असावे ह्याबाबत स्वतः निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सरकारी

# लेकराचं शिकणं कधी थांबतं का ?



युवराज माने
सेलू-परभणी

शिकणं कधी थांबत नाही.आजवर कितीतरी संकट आली. त्या प्रत्येक संकटावर मानवाने मात केली आहे. हे सर्व करण्यात माणूस कुठंच थांबला नाही. म्हणजे शिकत राहिला. शिक्षण सतत चालणारी प्रक्रिया आहे. संकटातूनही माणूस खूप काही शिकत असतो. आजवर अनेक रोग आले त्यावरही माणसाने औषधे व लशी शोधून काढल्या. ही एक शिक्षणाची प्रक्रियाच होय. यापुढे जाऊन माणसाने कोरोनावरची लस किती कमी कालावधीत तयार केली हाही कौतुकाचा विषय आहे. यापूर्वी लस तयार करण्यास कितीतरी वर्षे लागायची. पण तंत्रज्ञान विकसित करून माणूस खूप पुढचा विचार करत आहे. विचार करणे हा ही शिक्षणाचाच एक भाग आहे.

कोरोनाचं संकट आलं आणि काही काळ जग थांबल्यासारखंच झालं.पण काही गोष्टी सुरू होत्या. अनेक जणांची जीवन जगण्याची धडपड सुरू होती. आलेल्या संकटावर कशी मात करायची याचं जिवंत शिक्षण माणूस घेत होता. म्हणजेच शिक्षण सुरूच होतं. फक्त शाळेतच शिक्षण होतं, किंबहुना दिले जाते ही आपल्या सर्वांची धारणा आहे किंवा होती ती कोरानाच्या संकटाने आता बदलली आहे असे म्हणावे लागेल.

शाळा बंद होत्या तरी लेकरांच शिकणं सुरू होतं हे मी ठामपणे सांगतो. कारण पहिल्यांदाच कुटुंबातले सर्व सदस्य एकत्र आले होते. ही मोठी संधी लेकरांना होती. सर्व सदस्यांनी एकत्र येऊन राहण्याचे प्रसंग यापूर्वी आले पण एक दोन दिवसासाठीचे आणि तेही सण, उत्सवात.पण कोरोनात अनेक महिने सोबत रहायला मिळाले. संकटात सोबत राहण्याची एक नवी शिख मिळाली.यात लेकरांना कुटुंबातील सर्व नातेवाईक जवळून अनुभवता आले.आजी-आजोबा यांचं कुटुंबातील स्थान, त्यांचे



अनुभव, बालपणातील अनेक गोष्टी लेकरांना ऐकायला मिळाल्या.आई स्वयंपाक कशी करते, त्यात लेकरांना सहभागी होता आलं, घरातील कामे करताना आई किती थकते हेही लेकरांना अनुभवता आलं. आईमुळेच आपण सर्वजण व्यवस्थितपणे आपले काम पूर्ण करू शकतोय ही जाण पक्की झाली. आईचा जॉब किती कष्टाचा व महत्वाचा आहे हे सर्वांना कळलं.आपले वडील व त्यांचे भाऊ एकमेकांचा कसा आदर ठेवतात, त्यांचे स्वभाव अनुभवले.


शाळेच्या बाहेरचं जग विशेषतः कुटुंबाची सर्व अंग लेकरांना जवळून अनुभवता आली. जुने बैठे खेळ, शाब्दिक खेळ, जुनी गाणी, गोष्टी, चित्रं, रांगोळी, भेंड्या, भाषा अशा

शिकणं कधी थांबत नाही.आजवर कितीतरी संकट आली. त्या प्रत्येक संकटावर मानवाने मात केली आहे. हे सर्व करण्यात माणूस कुठंच थांबला नाही. म्हणजे शिकत राहिला. शिक्षण सतत चालणारी प्रक्रिया आहे. संकटातूनही माणूस खूप काही शिकत असतो. आजवर अनेक रोग आले त्यावरही माणसाने औषधे व लशी शोधून काढल्या. ही एक शिक्षणाची प्रक्रियाच होय. यापुढे जाऊन माणसाने कोरोनावरची लस किती कमी कालावधीत तयार केली हाही कौतुकाचा विषय आहे. यापूर्वी लस तयार करण्यास कितीतरी वर्षे लागायची. पण तंत्रज्ञान विकसित करून माणूस खूप पुढचा विचार करत आहे. विचार करणे हा ही शिक्षणाचाच एक भाग आहे.

कोरोनाचं संकट आलं आणि काही काळ जग थांबल्यासारखंच झालं.पण काही गोष्टी सुरू होत्या. अनेक जणांची जीवन जगण्याची धडपड सुरू होती. आलेल्या संकटावर कशी मात करायची याचं जिवंत शिक्षण माणूस घेत होता. म्हणजेच शिक्षण सुरूच होतं. फक्त शाळेतच शिक्षण होतं, किंबहुना दिले जाते ही आपल्या सर्वांची धारणा आहे किंवा होती ती कोरानाच्या संकटाने आता बदलली आहे असे म्हणावे लागेल.

शाळा बंद होत्या तरी लेकरांच शिकणं सुरू होतं हे मी ठामपणे सांगतो. कारण पहिल्यांदाच कुटुंबातले सर्व सदस्य एकत्र आले होते. ही मोठी संधी लेकरांना होती. सर्व सदस्यांनी एकत्र येऊन राहण्याचे प्रसंग यापूर्वी आले पण एक दोन दिवसासाठीचे आणि तेही सण, उत्सवात.पण कोरोनात अनेक महिने सोबत रहायला मिळाले. संकटात सोबत राहण्याची एक नवी शिख मिळाली.यात लेकरांना कुटुंबातील सर्व नातेवाईक जवळून अनुभवता आले.आजी-आजोबा यांचं कुटुंबातील स्थान, त्यांचे अनुभव, बालपणातील अनेक गोष्टी लेकरांना ऐकायला मिळाल्या.आई स्वयंपाक कशी करते, त्यात लेकरांना सहभागी होता आलं, घरातील कामे करताना आई किती थकते हेही लेकरांना अनुभवता आलं. आईमुळेच आपण सर्वजण व्यवस्थितपणे आपले काम पूर्ण करू शकतोय ही जाण पक्की झाली. आईचा जॉब किती कष्टाचा व महत्वाचा आहे हे सर्वांना कळलं.आपले वडील व त्यांचे भाऊ एकमेकांचा कसा आदर ठेवतात, त्यांचे स्वभाव अनुभवले.

शाळेच्या बाहेरचं जग विशेषतः कुटुंबाची सर्व अंगं लेकरांना जवळून अनुभवता आली. जुने बैठे खेळ, शाब्दिक खेळ, जुनी गाणी, गोष्टी, चित्रं, रांगोळी, भेंड्या, भाषा अशा कितीतरी अनुभूती लेकरांनी अनुभवल्या म्हणजेच लेकरांचं शिक्षण सुरू होतं हे नक्की आहे.आता राहिला प्रश्न शाळेतील नियोजित वेळेतला अभ्यास. पाठ्यपुस्तकं एक मार्ग आहे; ज्या मार्गाने गेल्यास शिक्षणाचे उद्दिष्ट पूर्ण होते. याबाबत मात्र शहरातील मुलांना काही ना काही करता आले. शहरातील शाळांना ऑनलाईन पद्धतीने शिकवता आले. ही एक प्रकारची मोठी उपलब्धीच म्हणावी लागेल.अनेक शिक्षकांनी शिकवण्याच्या अनेक पद्धती शोधून काढल्या. लेकरांना ऑनलाईन पद्धतीने शिकण्यात एक वेगळाच आनंद मिळू लागला पण तो काही काळच म्हणावा लागेल. नव्या गोष्टीतलं कुतूहल संपलं की लेकरं कंटाळतात. याशिवाय याला लागणारा पैसा व मुलांच्या डोळ्यांची, पाठीच्या मणक्याची होणारी हानी ही वेगळीच बाब आणि सर्वात गंभीर गोष्ट म्हणजे लेकरांच्या हाती दिलेलं मोबाईल हे साधन! याचा योग्य वापर झाला तर उत्तमचं पण यातून लेकरं दुसर्याच गोष्टींकडे वळले तर शिक्षणापेक्षा हानीच जास्त ऑनलाईन शिक्षण कमी-अधिक प्रमाणात खेड्यातील लेकरांनाही मिळालं. पण सर्व लेकरं यात सहभागी नव्हती.



शिकणं कधी थांबत नाही.आजवर कितीतरी संकट आली. त्या प्रत्येक संकटावर मानवाने मात केली आहे. हे सर्व करण्यात माणूस कुठंच थांबला नाही. म्हणजे शिकत राहिला. शिक्षण सतत चालणारी प्रक्रिया आहे. संकटातूनही माणूस खूप काही शिकत असतो. आजवर अनेक रोग आले त्यावरही माणसाने औषधे व लशी शोधून काढल्या. ही एक शिक्षणाची प्रक्रियाच होय. यापुढे जाऊन माणसाने कोरोनावरची लस किती कमी कालावधीत तयार केली हाही कौतुकाचा विषय आहे. यापूर्वी लस तयार करण्यास कितीतरी वर्षे लागायची. पण तंत्रज्ञान विकसित करून माणूस खूप पुढचा विचार करत आहे. विचार करणे हा ही शिक्षणाचाच एक भाग आहे.

कोरोनाचं संकट आलं आणि काही काळ जग थांबल्यासारखंच झालं.पण काही गोष्टी सुरू होत्या. अनेक जणांची जीवन जगण्याची धडपड सुरू होती. आलेल्या संकटावर कशी मात करायची याचं जिवंत शिक्षण माणूस घेत होता. म्हणजेच शिक्षण सुरूच होतं. फक्त शाळेतच शिक्षण होतं, किंबहुना दिले जाते ही आपल्या सर्वांची धारणा आहे किंवा होती ती कोरानाच्या संकटाने आता बदलली आहे असे म्हणावे लागेल.

शाळा बंद होत्या तरी लेकरांच शिकणं सुरू होतं हे मी ठामपणे सांगतो. कारण पहिल्यांदाच कुटुंबातले सर्व सदस्य एकत्र आले होते. ही मोठी संधी लेकरांना होती. सर्व सदस्यांनी एकत्र येऊन राहण्याचे प्रसंग यापूर्वी आले पण एक दोन दिवसासाठीचे आणि तेही सण, उत्सवात.पण कोरोनात अनेक महिने सोबत रहायला मिळाले. संकटात सोबत राहण्याची एक नवी शिख मिळाली.यात लेकरांना कुटुंबातील सर्व नातेवाईक जवळून अनुभवता आले.आजी-आजोबा यांचं कुटुंबातील स्थान, त्यांचे अनुभव, बालपणातील अनेक गोष्टी लेकरांना ऐकायला मिळाल्या.आई स्वयंपाक कशी करते, त्यात लेकरांना सहभागी होता आलं, घरातील कामे करताना आई किती थकते हेही लेकरांना अनुभवता आलं. आईमुळेच आपण सर्वजण व्यवस्थितपणे आपले काम पूर्ण करू शकतोय ही जाण पक्की झाली. आईचा जॉब किती कष्टाचा व महत्वाचा आहे हे सर्वांना कळलं.आपले वडील व त्यांचे भाऊ एकमेकांचा कसा आदर ठेवतात, त्यांचे स्वभाव अनुभवले.

शाळेच्या बाहेरचं जग विशेषतः कुटुंबाची सर्व अंगं लेकरांना जवळून अनुभवता आली. जुने बैठे खेळ, शाब्दिक खेळ, जुनी गाणी, गोष्टी, चित्रं, रांगोळी, भेंड्या, भाषा अशा कितीतरी अनुभूती लेकरांनी अनुभवल्या म्हणजेच लेकरांचं शिक्षण सुरू होतं हे नक्की आहे.आता राहिला प्रश्न शाळेतील नियोजित वेळेतला अभ्यास. पाठ्यपुस्तकं एक मार्ग आहे; ज्या मार्गाने गेल्यास शिक्षणाचे उद्दिष्ट पूर्ण होते. याबाबत मात्र शहरातील मुलांना काही ना काही करता आले. शहरातील शाळांना ऑनलाईन पद्धतीने शिकवता आले. ही एक प्रकारची मोठी उपलब्धीच म्हणावी लागेल.अनेक शिक्षकांनी शिकवण्याच्या अनेक पद्धती शोधून काढल्या. लेकरांना ऑनलाईन पद्धतीने शिकण्यात एक वेगळाच आनंद मिळू लागला पण तो काही काळच म्हणावा लागेल. नव्या गोष्टीतलं कुतूहल संपलं की लेकरं कंटाळतात. याशिवाय याला लागणारा पैसा व मुलांच्या डोळ्यांची, पाठीच्या मणक्याची होणारी हानी ही वेगळीच बाब आणि सर्वात गंभीर गोष्ट म्हणजे लेकरांच्या हाती दिलेलं मोबाईल हे साधन! याचा योग्य वापर झाला तर उत्तमचं पण यातून लेकरं दुसर्याच गोष्टींकडे वळले तर शिक्षणापेक्षा हानीच जास्त ऑनलाईन शिक्षण कमी-अधिक प्रमाणात खेड्यातील लेकरांनाही मिळालं. पण सर्व लेकरं यात सहभागी नव्हती. मोबाईल सर्वांना मिळू शकले नाहीत. म्हणून ते या प्रवाहात आले नाहीत. पण ग्रामीण भागात अनेक शिक्षकांनी

मराठी मासिक
शिक्षणयात्री

हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक लक्ष्मण गोरख बडगुजर यांच्या मालकीच्या प्रगती आर्टस्,पोलिस स्टेशन जवळ,जनता नगर शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र) येथे छापून ,प्लॉट नं. ५२ शिवपार्वती कॉलनी,करवंद नाका,शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक - शैला नंदकिशोर हजारे Reg No.MAHMAR2015/67226

पाहिलं पाऊल

# कालाय तस्मै नम.. दुसरं काय?



एम.के.भामरे
शिरपूर-धुळे



काळानुसार बदलतो तोच काळाच्या कसोटीत उतरतो. परंतु काळाबरोबर बदलत असतांना ह्या बदल प्रक्रियेचे सिंहावलोकन करणे ही तितकेच महत्वाचे आहे. ही संक्रमणाची क्रिया पाहण्यातही एक वेगळीच मजा असते. जुने चंदन कितीही सुगंधी असले तरी ते आधुनिक काळाच्या सहानीवर घासण्यात मजा नसते हे मी नेहमी सांगत असलो तरी, जुन्या चंदनाचा सुगंध दरवडत ठेवणे हे आमचे काम आहे. शास्त्रोक्त कसोटीत ऊतरलेल्या व विज्ञाननिष्ठ असलेल्या पध्दती या पिढीकडुन त्या पिढीकडे हस्तांतरीत होतात. ही क्रिया प्रामाणिकपणे झाली पाहीजे. जुने जाऊ द्या मरणालागु मी म्हणत कालबाह्य झालेल्या गोष्टी बदलल्याच पाहीजे. पण आताशा हा बदल होता होता वेगवेगळे रुप घेतो. काळ कसा बदलतो ना? आत्ता हेच पहा शाळेतल्या विद्यार्थ्यांचा पहिला दिवस म्हणुन स्वागताला गेलो होतो, सडा,रांगोळ्या,फुले, पाने, फुगे, पताकांनी शाळा सजवली होती. मंगलमय धुन वाजवुन वातावरण भारावले होते. भावगीते,भक्तीगीते व प्रेरणागीतांचा सूर गुंजत होता. लहान लहान मुले शाळेत आलेली होती.काही खुश होते,काही नाराज,काही एकटेच तर काही पालकांचा हात धरुन तर काही कडेवर बसुन त्यांचे आम्ही स्वागत केले.त्यांना चॉकलेट,पेन्सिल,फुगे दिले. सजवलेल्या गाडीतुन वाजत गाजत मिरवणुक काढली,नाश्त्याला गोड पक्कान्न दिला,ते पाहुन मी हरखलो. किती हो भाग्यशाली ही पोरं? किती त्यांची सरबराई, कसं स्वागत,किती सुविधा,किती सामुग्री, किती कोड कौतुक.. पाहुन मन तृप्त झाले नि सहज ६० वर्षांपुर्वीचा जमाना याद आला हो.. आमच्या बालपणी मायबाप बखोटं धरुन शाळेत आणायचे, आम्ही भोकाट पसरवायचो. आमचा अवतार ही पाहण्यासारखा असायचा. कमरेतुन नितरणारी

चड्डी,नाकातुन वाहणारा शेंबुड पुसत एका हाताने ती नितरणारी चड्डी सावरायचो. गुरुजी यायचे तेही बखोटे धरायचे आणि वर्गात बसवायचे. आम्ही रडायचो तेंव्हा गुरुजी शेमटीने शेपालायचे,ती एकच छडी आम्हाला नीट करायची. छडी लागे छमछम विद्या येई घमघम असे सांगीतले जायचे. मुलांना शाळेत टाकलेच पाहीजे हे पालकांना कंपलसरी नव्हते व शाळेलाही मुलांची गरज नव्हती.यायचं तर या नाही तर येवु नका, कौलारु शाळा,शेणामातीने सारवलेली. गुरुजींचा दरारा,आदरयुक्त भीती,ते आदर्श गुरुजी,गुरुंजींवरची पालकांची निष्ठा व विश्वास. गुरुजींच्या ताब्यात पोरगं गेलं की ते तावुन सुलाखुन बाहेर येईल असा आत्मविश्वास. नो ईंटरफियर नो दखल अंदाजी. गुरुजींनी छडी मारली म्हणुन पालकाची विचारायची ताफ नाही. काळ बदलला,परीस्थिती बदलली, आता शाळा ऊदंड जाहल्या.काळानुरुप बदलल्या.हायफाय झाल्या,गरजेप्रमाणे सुधरल्या आहेत. विद्यार्थी संख्या मिळवणेसाठी शाळेची दमछाक होते. मग त्यासाठी हे सर्व सोपस्कार सुरु झाले.शाळेतला फराळ,खाऊ,चॉकलेट.. आमच्या काळी घरुन खिशात आणलेल्या शेंगा,चिंचा,बोरे हाच खाऊ. आत्ता तर सरकारी जेवण मिळते. मुलांची चंगळच.. मुलांचा सत्कार करता करता डोक्यात फिरत असलेले हे चक्र ६० वर्षापुर्वी गेले. वृध्दापकाळी भुतकाळ विसरावा असं सांगणारा मी परंतु मीच भुतकाळात शिरलो. ते दिवस आठवले,माय बाप आठवले,शाळा आठवली ,गुरुजी आठवले .... टच् कन डोळ्यात पाणी आले. आणि पोरांना मोठ्याने वेल् कम बॉईज वेल् कम बॉईज.. म्हणालो. आता सारेच बदलले. ते गुरुजी गेले ,ती छडी गेली.तिचा अती वा गैर वापर झाल्याने आता छडी वापरणे गुन्हा झाले. पण खरं सांगु का? रोपट्याला जसा आपण काठीचा आधार लावुन ताठ ठेवतो.तेंव्हा कुठे त्या आधाराने ताठ मानेने वाढायचे शिकते. उन वारा पाऊस वादळाला तोंड देत स्वयंभु पणे ऊभे ठाकते,फुलते फळते. मला वाटते ती छडी ही अशीच होती. बालपणाचे रोपटे विकसीत करणेसाठी ती मदतनीस होती. मुलांचे मानसशास्र,मुलांची मानसिकता वगैरे वगैरे बोजड संकल्पना त्यावेळी नव्हती. पोरगं चुकलं की छडी मारायची. पुन्हा ते चुकणार नाही ही त्या मागे भावना. छडी राजदंड,मापदंड व शिक्षादंडही.पण ती गेली. निदान फुत्कार मारण्यापुरती तरी असायला हवी होती. मुलांचे स्वागत करणे ही तशी छान गोष्ट. बच्चे मनके सच्चे अशा या बालकांचे स्वागत करतांना मनाला जो आनंद होतो तो अवर्णनीयच. आनंददायी शिक्षण,आनंददायी वातावरण असायला हवे. पण असे स्वागत,अशी सरबराई,वेगवेगळी शैक्षणिक उपकरणे,खेळणी,पालकांनी येणे,पालकांनीच अभ्यासाची काळजी करणे,त्यांनीच होमवर्क करुन ठेवणे,त्यांनीच हाताने भरवणे,कोचिंग क्लासेस लावणे,पालकांनीच दिशा ठरवणे या गोष्टी काळानुसार क्रमप्राप्त असल्या तरी मुलांमधली उपजत बुध्दीला आपण बुजवुन टाकतोय का? त्यांच्या स्वयंभु आस्तित्वाला आळा घ लतोय का? त्यांची कल्पनाशक्ती ला बुजुन टाकतोय का? शैक्षणिक क्षेत्रातली जीवघेणी स्पर्धा ही पालक व विद्यार्थी दोघांना त्रासदायक का? विद्यार्थ्यांना आकर्षित करणेसाठी हे चालते का? असे असंख्य विचारांचे झंझावात माझ्या पांढऱ्या शुभ्र डोक्यात घुमत होते. बस्स कर यार, गेला तो जुना जमाना. आज हीच स्पर्धा आहे.त्यांच्या पेक्षा माझे स्वागत जंगी. माझ्यापेक्षा त्याचे जंगी. असे म्हणत या पध्दती रुजु देत ना. एकापेक्षा एक तज्ञांच्या कसोटीतुन तावुन सुलाखुन निघालेल्या या सिस्टीम बद्दल म्या पामराने काय बोलावे? कालाय तस्मै नमः,... असं पुटपुटत माझ्या मनातलं माझ्यापुरतं तत्वज्ञान आटोपतं घेत मी घरचा रस्ता धरला.

९८५०५१५४२२

# उपक्रमांची रेलचेल!



दिप्ती काळे
पुणे

शालेय वयात मुलांवर समृध्द शिक्षण संस्कार व्हावेत यासाठी नेहमीच प्रयत्न असतो. अभ्यासक्रमाबरोबर इतर शैक्षणिक उपक्रमांची रेलचेल वर्गाचा आनंद वाढवते. मुलांना कार्यप्रवण ठेवते. बुध्दीला नि हाताला काम मिळाल्याने मुले वर्गात सदैव कार्यमग्न असतात. वर्गात आलेलं प्रत्येक मुल एकाच वातावरणातून येत नाही. प्रत्येकाची पार्श्वभुमी देखील भिन्न असते. अशावेळी त्यांना देण्यात येणाऱ्या अनुभवातही भिन्नता असणे गरजेचे हे ओळखून विविध उपक्रमांच्या माध्यमातून मुलांवर समृध्द शैक्षणिक संस्कार घडवण्याचे कार्य सुरू आहे.

उपक्रम लहान नि छोटेसे वाटत असते तरी मुलांच्या दृष्टीकोनातून उपक्रमांच्या, अनुभवाचे मोल जास्त आहे म्हणूनच काही उपक्रमांची ओळख.

**गोल्डन स्टुडन्ट :**

दररोज नियमितपणे शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना महिन्याच्या शेवटच्या दिवशी आणि सुरू होणाऱ्या महिन्यातला पहिल्या दिवशी स्टार देऊन (लावून) मुलाचे कौतूक केले जाते त्याला 'गोल्डन स्टार' दर्जा देऊन इतर मुलांना प्रेरीत केले जाते.छोटे संवाद कृती इंग्रजीतून घेतले जातात. नाटयीकरण सादर केले जाऊन इंग्रजी भाषेची भिती दूर होऊन इंग्रजी संवादाचा आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत होते. विज्ञानाच्या सोबतीने.जीवन जगत असतांना आपणास विज्ञानाची सदैव सोबत असते. दैनंदिन जीवनात छोट्या गोळटीत कृतीतही विज्ञानाचा संदर्भ असतो हे मुलांना उदाहरणांसह पटवून दिले जाते. विज्ञान दिनानिमित्त लहान मोठे प्रयोग, सादरीकरण, वैज्ञानिकांची माहिती असे उपक्रम घेतले जातात.

**संस्काराचे बीज रोवण्यासाठी:**

शालेय शिक्षण घेत असतांना संस्कारांची बीजं रोवण्यांच काम झालं पाहिजे याकडे कटाक्ष असतो. मुलं शिक्षण तर



घेताहेत पण संस्कारांनी समृध्द व्हायला हवीत जेणेकरून आदर्श नागारिक घडवण्याचा निमित्ताने एक पाऊल ठरेल.म्हणून नियमित गोष्ट ऐकवण्या बरोबर ई-लर्निंग प्रोजेक्टद्वारे आवडीच्या संस्कारक्षम गोष्टी ऐकवल्या जातात. संस्कार फिल्म दाखवल्या जातात.

**शब्द संपत्ती वाढवूया.**

मुलांचा शब्दसंग्रह जितका मोठा तितका त्यांच्या संवाद कौशल्यासाठी पूरक ठरतो. लेखन कौशल्यात भर पडते. म्हणून शब्द संग्रह वाढवण्यासाठी वाचनावर भर त्याबरोबर शब्द खेळ घेतले जातात. वर्तमान पत्रातील ठळक शब्द



वाचून घेतले जावून

**खरेदी विक्री अनुभव :**

रूपये पैसे यांची बेरीज वजाबाकी समजण्यासाठी, संख्याज्ञान होण्यासाठी, व्यवहार ज्ञान समजण्यासाठी प्रत्यक्ष वर्गात खरेदी विक्रीचा खेळ घेतला जातो. विद्यार्थ्यांच्या वापरातील शैक्षणिक साहित्याबरोबर गणितपेटीतील साहित्याचा वापर केला जातो.तसेच मुलांना आई वडिलांबरोबर बाजारात गेल्यावर होणाऱ्या व्यवहारांची माहिती घेणे किंवा त्याकडे लक्ष देऊन रहाण्याचा सूचना देखील केल्या जातात.

**शनिवार माझा आवडीचा :**

प्रत्येक विद्यार्थ्याची इयत्ता पहिली मध्ये आल्यावर माझे उपक्रम नावाची स्वतःची फाईल बनवली जाते. त्या फायली शिक्षकांकडे जमा केलेल्या असतात. प्रत्येक शनिवारी दप्तरविना मुलांना शाळेत बोलावले जाते आणि शनिवार आवडीचा होण्यासाठी त्यांच्या आवडीनुसार कलागुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम सुंदर हस्ताक्षर, रेखाटने, रंगभरन, कोलाज काम, ठसे काम, बैठे खेळ, असे विविध उपक्रम राबवले जातात. या सर्व उपक्रमाच्या नोंदी, कृती उपक्रमाच्या फाईलमध्ये लावल्या जाऊन आठवीपर्यंत जपून ठेवली जाते. व आठवनीतू शाळा सोडून जातांना विद्यार्थ्यांना ती फाईल दिली जाते. पहिली पासूनच्या आपल्या कृती पाहून मुलांना खूप आनंद होतो. ते जपून ठेवतात.

**इंग्रजी संभाषणासाठी :**

बहुतांश मुले मराठी भाषिक असल्याने इंग्रजी संभाषणाचा अथडळा जाणवतो. तो दूर करण्यासाठी समानार्थी विद्यार्थी शब्दांची, यमक जुळणारे शब्द, अशा विविध शब्दांची सांगड घातली जाते. यासह पाढे पाठांतर स्पर्धा,माता-पालक संघाच्या माध्यमातून आरोग्य जागृती, दशक एकक खेळ, संख्याक्रियाचे खेळ, खेळू करू. शिकू यासाठी उपक्रम, पर्यावरण पूरक साहित्याची ओळख, गणेशमुर्ती बनवते. स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सवी विविध उपक्रम घेतले जातात. विद्यार्थ्यांना घरापेक्षा शाळा - वर्ग आवडावी म्हणून शाळेत आनंददायी शिक्षणाची रेलचेल असावी हाच प्रयत्न सदैव असतो.

**(दिप्ती सुरेश काळे या उपशिक्षिका म्हणून कै.विठ्ठलराव गेणुजी बेलदरे पाटील विद्यालय, पुणे महानगरपालिका क्रमांक १६० बी दत्तनगर या शाळेत कार्यरत आहेत.)**



निमित्ताने

# विठ्ठलाचे झाड



सुदाम विश्वे
येरवडा,पुणे

पंढरपूरकडे निघालेल्या वारीतील पालख्यांचा मुक्काम पुण्यात होता.अवघे पुणे विठ्ठलमय झाले होते. संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिरात ; तर संत तुकाराम महाराजांची पालखी नाना पेठेतील निवडुंग्या विठोबा मंदिरात आली होती. ज्यांना प्रत्यक्ष वारीत सहभागी होता येत नव्हते ते भाविक पालख्यांच्या दर्शनासाठी आले होते.जणू भक्तांचा महापूर लोटला होता.प्रत्येक दिंडीतील वारकरी विठ्ठल नामाचा गजर करीत होते.

यावर्षी विनय आईसोबत नाना पेठेतील निवडुंग्या विठोबा मंदिरात संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी आले होते. कुठे कीर्तन ; तर कुठे भजन सुरू होते. लाऊडस्पीकरवर देखील विठ्ठलाचे अभंग लागलेले होते. विनय व आई दर्शनाच्या रांगेत उभे होते. रांग हळूहळू पुढे सरकत होती. विनय आजूबाजूचे निरीक्षण करीत होता.रांगेतील भाविक होत जोडून विठ्ठल विठ्ठल म्हणत होते.

विनय व आई पालखीपाशी आले.आईने तुकाराम महाराजांच्या पादुकांवर डोकं ठेवून नमस्कार केला. विनय देखील नतमस्तक झाला.दोघेही प्रसन्न चित्ताने मंदिराच्या बाहेर पडले. मंदिराच्या बाहेर एका स्वयंसेवी संस्थेचे कार्यकर्ते पर्यावरणाचे महत्त्व पटवून सांगत होते व दर्शन घेऊन आलेल्या प्रत्येकाला झाडाचे एक रोपटे भेट म्हणून देत होते. विनयला हा उपक्रम आवडला.शाळेतील शिक्षक देखील प्रत्येकाने एक झाड लावावे असे सांगत. विनय व आईला देखील एक रोपटे मिळाले.आता हे रोपटे सोसायटीच्या आवारात लावून त्याची नियमित देखभाल करायची असे मनोमन ठरवत विनय घरी आला.

विनयने घरात पाऊल टाकताच विनयचे बाबा म्हणाले, काय विनय,झाले का दर्शन? आणि हे हातात काय आहे ? विनय म्हणाला,हो बाबा छान दर्शन झाले. तेथील एका संस्थेने प्रत्येकाला एक एक झाड भेट म्हणून दिले आहे.बाबा म्हणाले कसले झाड आहे,पाहू बरं.विनयच्या तोंडातून पटकन शब्द बाहेर पडले, बाबा हे 'विठ्ठलाचे झाड' आहे. दिवसभर विठ्ठल विठ्ठल शब्द कानावर पडल्यामुळे विनयने झाडाला नाव दिले 'विठ्ठलाचे झाड.'बाबांना विनयचा ' विठ्ठलाचे झाड ' हा शब्द खूप आवडला.बाबा म्हणाले, हो विनय,ही सृष्टीच विठ्ठलाची आहे.झाडे,पक्षी, डोंगर,आकाश या सर्वातच विठ्ठल वास करीत आहे. या ' विठ्ठलाच्या झाडाची ' खूप काळजी घे.त्याला नियमित पाणी घाल. पुढच्या वारीपर्यंत तुझे हे ' विठ्ठलाचे झाड 'तुझ्या उंचीइतके नक्की वाढलेले असेल. असे म्हणत बाबांनी विनयला जवळ घेतले. आई बापलेकांचा संवाद कौतुकाने ऐकत पुटपुटत होती, 'विठ्ठल, विठ्ठल !

- ९८६०५८६१४७

उरल्या त्या आठवणी...

# असे गुरु असा अनुभव




उज्ज्वल कुलकर्णी

पुणे




कै.होनजी सुभान वळवी,गुरुजी

नऊ वर्षाचं वय होतं. वक्तृत्व स्पर्धेत तुझे नाव आहे झाशीची राणी हा विषय आहे. शाळेतून मला सांगितलं गेलं मग तसंच घरी सांगितलं . अमृत चित्रपटगृहात वकृत्व स्पर्धा होणार होती.स्पर्धेच्या दिवशी सर्व गुरुजनांना वाकून नमस्कार करून गुरुजींबरोबर मी चित्रपट गृहाकडे निघालो. पांढरे धोतर, पांढरा हाफ बाहीचा शर्ट, डोक्यावर पांढरी टोपी, उंचेपुरे असलेले नटावद हे मुळगाव असलेले,कडक शिस्तीचे पण मनाने अतिशय प्रेमळ श्री होनजी सुभान वळवी हे गुरुजी माझा हात धरून शाळेबाहेरच्या रस्त्यावर आले. थोडे अंतर गेल्यावर रस्त्यावरची गर्दी वाढू लागली मग त्यांना काय वाटले कोणास ठाऊक ते पटकन खाली बसले आणि मला म्हणाले –बैस माझ्या खांद्यावर. मी थोडासा घाबरलो आणि संकोचलो. नंतर ते म्हणाले – बैस लवकर बाळऽआपल्याला उशीर होतो आहे–ऽ तिथेही गर्दी असेल आपल्याला वेळेवर पोचणे गरजेचे आहे तेव्हा आता पटकन बैस बाळ . मी गुरुजींच्या खांद्यावर बसताच त्यांनी झपझप चालायला सुरुवात केली. रस्त्यातल्या गर्दीतून वाट काढताना ते मला म्हणाले– माझ्या डोक्याला घट्ट धर बाळा घाबरू नको. असे सांगत गुरुजींनी पुढे चालणे सुरू ठेवले. अमृत चित्रपटगृहापाशी येताच तेथील गर्दी पाहून गुरुजी म्हणाले– माझ्या डोक्यावरची हातांची पकड घट्ट राहू दे.. असे म्हणत मुसंडी मारत पुढे जात जात गुरुजींनी तिथल्या लोकांना सांगायला सुरुवात केली –स्पर्धेत भाग घेतलेला मुलगा आहे उशीर होतो आहे.. रस्ता द्या आणि जाऊ द्या एका बिल्ला लावलेल्या व्यक्तीने थेट पहिल्या रांगेत जिथे स्पर्धक बसलेले होते तिथपर्यंत व्यवस्थित पोहोचवून दिले.मी मुलांमध्ये बाकावर बसलो. मागच्या बाकावर गुरुजी बसले. समोर चित्रपटगृहातला पांढरा शुभ्र पडदा होता. त्याच्या समोर व्यासपीठ आणि बाजूला परीक्षकांची बैठक व्यवस्था होती. सारे कसे भव्य पण बालवयात मानसिक धैर्यही वेगळेच असते. प्राथमिक शालेय गटाची स्पर्धा सुरू झाली. माझे नाव पुकारले गेले मी सर्रकन काळ्या पडद्यांच्या मधल्या स्त्याने व्यासपीठावर पोहोचलो. निघतांना गुरुजींचे शब्द कानावर पडले बाळ घाबरायचं नाही खणखणीत बोलायचं हं. हे शब्द माझ्या कानात घुमत होते. मुळातच माझी उंची कमी होती. ध्वनीक्षेपकाचे तोंड वरच्या बाजूला होते. आपण हाताने ते खाली करण्यापेक्षा तोंड वर करून बोलायला सुरुवात करणेच योग्य वाटल्याने लगेच भाषणाला सुरुवात केली पण कुणीतरी येऊन ध्वनिक्षेपकाचे तोंड खाली केले. त्यावेळी मला काहीच भान नव्हते. ती झाशीची राणी.. इंग्रजांची प्राणप्रणाने लढणारी. आणि घोड्यावर भरधाव वेगाने विजेसारखी तळपणारी! एवढ्या गर्दीतही माझ्या नजरेने चित्रपटगृहाच्या दारात उभ्या असलेल्या माझ्या दोन्ही बहिणींना म्हणजे श्यामला आणि सुलभा यांना निरखून घेतले आणि वेगळेच बळ आले. भाषणानी गती घेतली. इंग्रजांची गोळी लागलेली, पाठीवर पोर असलेली

झाशीची राणी गंगादास साधूंच्या कुटीमध्ये घोड्यासह शिरली. पोराला जबाबदार व्यक्तीच्या स्वाधीन केलं पण गोळीने आपले काम केले. सहज वाहणारे डोळे प्रसंग वर्णन करताना धूसर होणारी समोरची प्रचंड गर्दी आणि अखेरच्या क्षणापर्यंत जिवाच्या आकांताने इंग्रजांशी लढणाऱ्या झाशीच्या राणीच्या शौर्याचे वर्णन करीत करीत अभिवादनाने केलेला भाषणाचा शेवट.टाळ्यांच्या कडकडाटापेक्षाही झाशीच्या राणीत अडकलेलं बालमन. प्रथम क्रमांकाचे पदक गळ्यात आणि खूप मिळालेली रोख बक्षीसे. त्यात गुरुजींनी पाठीवर थोपटून दिलेली शाबासकी. दुसऱ्या दिवशी शाळेमध्ये कौतुकाचा सोहळा. शाळा जिंकल्याचा आनंद सगळ्यांच्या चेहऱ्यावर होता.आज ६७ वर्षांनंतर मात्र सारे आठवताना खांद्यावर बसवून नेणाऱ्या श्रद्धेय कै.होनजी गुरुजींच्या आठवणीने डोळे पाणावतात.

९४२२२८८०६२

**माझी कविता**

## शिक्षण

लोक म्हणती गुरुजीं
शाळेमध्ये शिकवा हो
पोर आमची हुशार
थोडी तरी बनवा हो

लोक म्हणती शिक्षक
कुठ शिक्षण देतात
फक्त फुकट पगार
सारे शिक्षक घेतात

शोकांतिका झाली आहे
शैक्षणिक विभागाची
विद्यादान देऊनही
बदनामी शिक्षकांची

लोक म्हणती शिक्षक
नाही राहिला आदर्श
शाळेमध्येही विदयार्थी
कुठे आहे पारदर्श

एका हाताने कधीच
कुठे वाजते का ? टाळी
चोर सोडून शिक्षेची
आता सन्यास्याची पाळी

शिक्षक आणि विद्यार्थी
दोन्ही परस्परावलंबी
शाळेसाठी आवश्यक
कोणी नसे स्वावलंबी

पालकांनी शिक्षकांना
दोष देऊ नये जास्त
पाल्य करतो प्रगती
शिक्षकांच्या मुळे रास्त

काही लोकांच्या मुळेच
सर्व समाज किडतो
मात्र विद्यार्थी आजही
शिक्षकांमुळे घडतो

**प्रा.वर्षा विलास कावरे**
मुर्तिजापूर-अकोला
९०२१६७३१७८

चिंतेचा विषय

# विद्यार्थी आत्महत्या



सुनिल पाटील
शिरपूर

मी भारत सरकार आणि मानव संसाधन मंत्रालयाला सांगू इच्छिते की जर सरकारची इच्छा असेल की मुलांनी जगावे तर त्यांनी हे कोचिंग क्लासेस प्रथम बंद करा. कारण हे कोचिंग क्लास विद्यार्थ्याचे आयुष्य उद्धवस्त करते. अभ्यासाच्या ओझ्याखाली विद्यार्थी पूर्णतः दबलेले असतात. मी स्वतः अनेक विद्यार्थ्यांना आत्महत्येपासून परावृत्त केले, डिप्रेशनमधून बाहेर पडण्यासाठी मदत केली. परंतु स्वतःला मी यापासून वाचवू शकले नाही. मला ९०+ मार्क्स असूनही मी आत्महत्या करत आहे. मी तुम्हाला सांगू शकत नाही माझ्या डोक्यात किती राग आणि द्वेष भरलाय. 'आई, मी लहान आहे, तुझी प्रत्येक गोष्ट ऐकते याचा तू फायदा घेतलास. तुला आनंदी ठेवण्यासाठी मी विज्ञानाचा अभ्यास केला. मला क्वान्टम फिज़िक्स आणि एस्ट्रोफिज़िक्स आवडू लागले होते. मला त्यात B.sc करायचे होते. परंतु तुला आनंदी ठेवण्यासाठी मी JEE चा अभ्यास करू लागले होते. आई माझ्यासारखेच वर्तन माझ्या लहान बहिणीशी करू नकोस. तिला जे बनायचे, तिला जे शिक्षण घ्यायचे ते घेऊ दे. कारण की तेच काम ती अत्यंत मन लावून करू शकते जे तिला आवडते.२४ फेब्रुवारी २०२३ रोजी कोटा येथे JEE च्या कोचिंग क्लासेससाठी गेलेल्या 'कृती' नावाच्या मुलीने आत्महत्येपूर्वी ही सुसाइड नोट लिहून ठेवली. १६/१७ वर्षाच्या मुलीची सुसाइड नोट आपल्याला अंतर्मुख करून जाते. आपण नेमके काय करतोय? आपल्या मुलांच्या माध्यमातून आपली स्वप्ने महत्वाकांक्षा, इच्छा, आकांक्षा पूर्ण करण्यासाठी, इतरांशी स्पर्धा करण्यासाठी आपल्याच मुलांच्या आयुष्याशी खेळतोय.Crime Record Bureau ): NCRB च्या अहवालानुसार २०१५ साली देशातील एकूण विद्यार्थी आत्महत्येपैकी १३% विद्यार्थी आत्महत्या महाराष्ट्रात झाल्या होत्या. या काळात



देशात एकूण ८९१२ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या त्यापैकी महाराष्ट्रातील १२३० विद्यार्थी होते.२०१७ साली हे प्रमाण ७.४०% वाढले.– २०१९ साली हे ७.६०% झाले.

२०२० साली हे ८.२०% झाले. तर२०२१ साली ८% म्हणजे ०.२०% ने घट झाली. परंतु कोरोना काळात विद्यार्थी आत्महत्येचे प्रमाण वाढले होते.२०२० साली देशात १२५२६ विद्यार्थ्यानी आत्महत्या केल्या तर २०२१ साली १३०८९ विद्यार्थ्यानी आत्महत्या केल्या. त्यापैकी महाराष्ट्रातील १८३४विद्यार्थी होते.त्याचप्रमाणे म. प्रदेश =

१३०८ विद्यार्थी तामिळनाडू = १२५६ विद्यार्थी आत्महत्या – २०२० साली प्रत्येक ५२ मिनिटाला १ विद्यार्थी आत्महत्या करत होता. – एकूण आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी पुरुष ५६.५% होते. यात मुलींचे प्रमाण कमी२होते.– देशात २०१७ साली ४१११ विद्यार्थ्यानी आत्महत्या केली तर २०२१ साली ही संख्या ५६९३ होती. – २०२१ मध्ये आत्महत्या करणारे ८९५२ विद्यार्थी १४ ते १८ या वयोगटातील होते. उच्चशिक्षणात प्रमाण कमी आढळते.अर्थात ही आकडेवारी NCRB ची शासकीय आकडेवारी आहे. प्रत्यक्षात हे प्रमाण जास्त असेल.कारण NCRB चा रिपोर्ट १०० पैकी ६३% माहिती प्रकाशित करतो.

**कोटा आत्महत्येचे केंद्रबिंदू (suicide hub):**

कोटा है JEE आणि NEET च्या कोचिंग क्लासेसला येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचे केंद्र बनले आहे. जानेवारी २०२२ ते २०२३ दरम्यान २३ विद्यार्थ्यानी आत्महत्या केली. कोटामध्ये दर दोन दिवसात १ विद्यार्थी आत्महत्या करतो.१५ मे २०२३ रोजी तेलंगणामध्ये १२ वी च्या निकालानंतर २४ तासात ६ विद्यार्थ्यानी आत्महत्या केल्या. एकट्या हैद्राबादमध्ये ५ विद्यार्थ्यानी, आंध्रामध्ये १० विद्यार्थ्यानीआत्महत्या केल्या.IIT भारतातील सर्वात नावाजलेली संस्था खखढ मध्ये ७ वर्षात १२० आत्महत्या झाल्या. हा आकडा २०२१ चा आहे. याचवर्षी मुंबई–पवईला १ मुलाने आत्महत्या केली.आत्महत्येची कारणे:

**१) अकॅडमी प्रेशर:**

केवळ आपल्या क्लासची गुणवत्ता वाढवण्यासाठी आणि ती टिकून राहावी म्हणून विद्यार्थ्यावर ॲकडमीच्या अभ्यासाचे, सरावाचे प्रचंड प्रेशर असते. सतत अभ्यास, सराव यांचा भडिमार केला जातो. यात विद्यार्थ्यांची मानसिकता विचारात घेतली जात नाही आणि परिणामतः विद्यार्थी आत्महत्येस बळी पडतो.

**२)समुपदेशनाचा अभाव :**

Mental Health -ct(MH– २०१७) नुसार प्रत्येक महाविद्यालय, अकॅडमी यांना मानसिक आजार असणाऱ्या, निराशेने ग्रस्त असणाऱ्या विद्यार्थ्यांना समुपदेशक / मानसोपचारची सुविधा पुरविण्याचे निर्देश दिले गेले आहे. पण हे बंधनकारक नसल्याने त्याची सक्तीने अंमलबजावणी होत नाही.

**३) एकटेपणा / घरापासून दूर** ( Isolation and Lonliness):

JEE आणि NEET च्या तयारीसाठी पालक मुलांना दुसऱ्या शहरात पाठवतात घरापासून दूर असल्यामुळे विद्यार्थी एकटेपणाच्या भावनेने ग्रस्त होतो. एकटेपणाची भावना मनाला कमकुवत करते. यातच जर अभ्यासाचे ओझे पडले तर विद्यार्थी अधिकच निराशेच्या खाईत लोटला जातो. विद्यार्थ्यांना या काळात स्वतःच्या कुटूंबाच्या सहकार्याची आवश्यकता असते.

**४) सुसंवादाचा अभाव :**

बऱ्याच कुटुंबात पालक आणि मूल यांच्यात संवाद साधला जात नाही. पालकांबद्दल मुलांच्या मनात असलेली भीती किंवा पालकांच्या कामाचा व्याप यामुळे संवाद घडून येत नाही. परिणामतः मूल आपल्या भावना विचार व्यक्त करण्यास असमर्थ ठरतो. अशावेळी असूरक्षिततेची भावना निर्माण होते जी मुलांना आत्महत्येस प्रवृत्त करते.

**५) पाठिंब्याचा अभाव (lack of support):**

अपयशाची भीती, अकॅडमी प्रेशर, घरापासून दूर, एकटेपणा अशा अनेक समस्यांशी मूल एकाच वेळी झुंज देत असते. त्यांना समजून घेणे, त्यांना पाठिंबा देणे हे पालक म्हणून कर्तव्य असते. परंतु अनेकवेळा कौटुंबिक पाठिंब्याचा अभाव दिसून येतो. परिणामतः विद्यार्थी खचतो आणि आत्यंतिक निराशेतून तो आत्महत्येचे पाऊल उचलतो.

**उपाय:१) मानसिक स्वस्थ मजबूत करणे:**

मोठी युद्धे असो की जीवनातील संघर्ष लढण्यासाठी भक्कम मानसिकतेची आवश्यकता असते. कॉन्सिलिंग, कुटुंबाशी सुसंवाद, विद्यार्थ्याला भावना, विचार व्यक्त करण्याची संधि देणं, विविध बोधप्रद पुस्तकांचे वाचन, छंद जोपासणे अशा अनेक प्रकारे विद्यार्थ्यांची मानसिकता सुदृढ करता येते त्यामुळे विद्यार्थी निराशेच्या गर्तेत अडकत नाही...

**२) सकारात्मक दृष्टीकोन:**

जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन व्यक्तीला आशावादी

बनवितो. विद्यार्थ्यांना प्रेरणादायी चरित्राची ओळख करून देणे, विविध प्रसंगाद्वारे सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणे गरजेचे आहे.

**(३) वास्तवतेची जाणीव (सामाजिक भाव) :** पौगंडावस्थेत मूल स्वप्नांच्या विश्वात जगत असते. वेळीच वास्तवतेचे भान दिले नाही तर फार मोठा अपेक्षाभंग / निराशा हाती लागण्याची शक्यता असते. अनाथाश्रम, वृद्धाश्रम यासारख्या ठिकानांणा भेट दिल्यावर विद्यार्थ्यांना समाजातील भयाण वास्तवतेची जाणीव होते. त्याच बरोबर समाजातील आर्थिक परिस्थितीने दुर्बल घटकांच्या कष्टमय जीवनाचे दर्शन घडवल्यास त्याला स्वतःच्या पालकांच्या आर्थिक समस्येची जाणीव होते.

**४) खेळात सहभागी :**

खेळामुळे केवळ शरीरच नाही तर मनदेखील निरोगी बनते खेळात सहभागी झाल्यामुळे जय-पराजय खिलाडुवृत्तीने स्वीकारण्याची सवय जडते. परिणामतः प्रत्यक्ष व्यवहारातही व्यक्ति संकटाना हसत-खेळत सामोरे जातो. विद्यार्थी जर खेळात नेहमी सहभागी होत असेल तर नेहमी ताणतनावापासून मुक्त राहील.

**५) कौटुंबिक आधार** (Family support): जगातील सर्वात सुरक्षित आणि आनंदी ठिकाण असेल तर ते आपले घर घर म्हणजे केवळ चार भिंती, एक छप्पर किंवा फर्निचरने खचाखच भरलेला आधुनिक बंगला नव्हे तर माझ्यावर कोणतेही संकट आले, माझ्या हातून कोणतीही चूक झाली, अपयश आले तर मला समजून घेणारे, आधार देणारे खात्रीचे ठिकाण म्हणजे घर आणि आपले कुटुंब होय. विद्यार्थ्याला जर कुटुंबाचा भक्कम आधार असेल, कुटुंबावर मनापासून विश्वास असेल तर किती जरी नैराश्य आले तरी विद्यार्थी कुटुंबाकडे धाव घेईल ना की आत्महत्येकडे.शासनाचे प्रयत्नःविद्यार्थी आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने केंद्र आणि राज्यपातळीवर अनेक विविध उपक्रम राबवलेले आहेत तसेच कायदेही तयार केले आहेत.

**(१)** MH- 2017 (Mental Health -ct): शासनाने विद्यार्थी आत्महत्या रोखण्यासाठी २०१७ साली चक- हा कायदा अमलात आणला. यानुसार मानसिक स्वस्थ हरवलेल्या प्रत्येक व्यक्तीचा मानसिक उपचार होणे तसेच समुपदेशन होणे हा त्याचा हक्क आहे. त्यानुसार प्रत्येक महाविद्यालय आणि अकॅडमी येथे विद्यार्थ्यांना समुपदेशन करण्याची सुविधा देण्याचे निर्देश दिले आहेत.

**२) किरण:**

सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय भारत सरकार तर्फे २४/७ अविरत चालणारी विशेष सेवा हेल्पलाइन १८००-५९९-००१९ ही टोलफ्री सेवा सुरू करण्यात आली आहे. व्यक्तीला डिप्रेशन आले असेल किंवा आत्महत्येचे विचार येत असतील हा नंबर डायल करून मदत मिळवू शकतात. संबंधित व्यक्तीचे कौन्सिलिंग करून तिला आत्महत्येपासून प्रवृत्त केले जाते.

**३) मनोदर्पण:**

आत्मनिर्भर भारत योजनेअंतर्गत भारताच्या केंद्रीय शिक्षण मंत्रालयातर्फे मनोदर्पण स्कीम राबवली जाते. या योजनेअंतर्गत विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांचे मानसिक स्वास्थ आणि कल्याणासाठी सामाजिक आणि मानसिक सहायता पुरवली जाते. याची सुरुवात केंद्र शिक्षण मंत्री यांनी २१ जुलै २०२० साली केली. मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या ऑफिशिअल वेबसाईटवर विविध प्रकारच्या सुविधा पुरवल्या जातात.

४) जागतिक आरोग्य संघटनेने १० सप्टेंबर २००३ पासून 'जागतिक आत्महत्या प्रतिबंध 'दिन' साजरा करणे सुरू झाले. या दिवशी संपूर्ण जगात पिवळी रिबिन बांधून सामाजिक संघटना जनजागृतीचे कार्य करतातफक्त आपण ऐकून घेतले तरी अनेक आत्महत्या थांबतील. म्हणून बोलू द्या. शेवटी आपले कुटुंब महत्वाचे.....

**(सुनिल गुलाबराव पाटील हे जि. प. शाळा तांडे ता. शिरपूर, जि. धुळे येथे कार्यरत आहेत.)**

९६८९३७३४२६

# फ्रिगेटबर्ड!



डॉ.नंदा हरम
पुणे

आजच्या लेखात आपण फ्रिगेटबर्ड वषयी जाणून घेणार आहोत. हे पक्षी फ्रिगेटबर्ड या कुलाचे असुन समुद्रपक्षी आहेत. सर्व उष्णकटिबंधी आणि उपोषण कटिबंधी सागरावर आढळतात. यांच्या आता अस्तित्वात असलेल्या पाच जाती आहेत. या पाचही जातीचे पक्षी कमी-अधिक प्रमाणात सारख्याच स्वरुपाचे आहेत. मॅग्निफिसंट फ्रिगेटबर्ड ही जाती आकाराने सर्वात मोठी आहे. आपण यावर आपलं लक्ष केंद्रीत करु.

**मॅग्निफिसंट फ्रिगेटबर्ड :-**



या पक्ष्याची लांबी ३ ते ४ फुट असुन पंखाचा पसारा ७ ते ८ फुट एवढा असतो. त्यामानाने वजन फक्त सव्वा ते दीड किलोच असते. नर काळ्या रंगाचा असून त्याच्या गळ्याशी शेंदुरी-लाल रंगाची पिशवी (Pouch) असते. (आकृती १ पहा) जी प्रजननकाळात तो फुगवतो. त्याची पिसं काळ्या रंगाची असतात पण खांद्यावरील पिसांवर ऊन पडल्यावर जांभळ्या रंगाची चमक जाणवते. मादी ही काळ्या रंगाची असून तिच्या मानेखालचा व छातीचा भाग पांढरा असतो. (आकृती १ पहा) तिच्या पंखांवर तपकिरी पट्टे असतात. मादी ओळखण्याची मुख्य खुण म्हणजे तिच्या डोळ्याभोवती निळ्या रंगाचे वलय असते.

**उड्डाणाचे वैशिष्टये:-**

मॅग्निफिसंट फिग्रेटबर्ड उड्डाणाकरिता प्रसिध्द आहे. आकाशातच तो अनेक दिवस रात्र राहू शकतो. सेकंदाला सरासरी २ ते ३ वेळा तो पंख फडफडवतो. जमिनीवर उतरण्यापुर्वी त्याचा वेग ताशी १० किमी असून तो जवळ-जवळ २२३ किमी अंतर कापतो. तो २४०० मी उंचीपर्यंत आकाशात उडू शकतो.हर्रिकेन (चक्रीवादळ) च्या जोरदार वाऱ्यावरही तो स्वार होऊ शकतो. आधी उद्धृत केल्याप्रमाणे त्याच्या पंखांचा पसाराच ७ ते ८ फुट आहे. यावरुन त्याच्या सामर्थ्याची कल्पना येऊ शकते.

हा समुद्रपक्षी असूनही समुद्राच्या लाटेवर तो कधी स्वार होत नाही. कारण लक्षात येतंय का तुमच्या ....? त्याचे पंख जलामेध नसतात. जर ते भिजले तर जड होतील. त्यामुळे हा पक्षी उडू शकणार नाही. कदाचित पाण्यात बुडेल ही ...! या पक्ष्याचे पाय आणि पंजे अतिशय छोटे असतात, त्यामुळे पाण्यावर वल्ह्याची क्रिया करु शकत नाहीत. तसेच जमिनीवर



चालणं ही त्यांना कठीण जातं.

(उंचावर उडत असतांना त्यांना फारसे श्रम पडत नाहीत. (आकृती क्र. २ पहा) चित्रात दाखविल्याप्रमाणे चिमटयासारख्या शेपटीचा दिशा बदलण्याकरिता सुकाणूसारखा उपयोग करता येतो.)

**खाद्यचोरीत पारंगत :-**

मॅग्निफिसंट फिग्रेटबर्डसचं मुख्य अन्न असतं मासे, कवचधारी सजीव, जेलीफिश, स्क्विडं इ. किनाऱ्याजवळ ते आपलं भक्ष्य शोधतात. पाण्याच्या पृष्ठभागावर येणारे मासे किंवा बाहेर उडी मारणाऱ्या माशांना पकडण्यात हे पक्षी तरबेज असतात.




दुसरे वैशिष्टय म्हणजे दुसऱ्या समुद्रपक्षाचं खाद्य पळविण्यात ते हुशार असतात. समुद्रपक्षी एखादा मासा किंवा स्क्विड पकडून उडू लागतो तेव्हा ही फ्रिगेटबर्ड त्याचा पाठलाग करतो. (आकृती ३ पहा) त्याच्या शेपटीकडची पिसं पकडतो. त्यामुळे त्या पक्ष्याने तोंडात पकडलेलं भक्ष्य खाली पडते ते पटकन फ्रिगेटबर्ड आपल्या चोचीने पकडतो. (आकृती क्र. ४ पहा) दाखविल्याप्रमाणे त्याची चोच लांब, पातळ आणि हुक असलेली असते. या आपल्या धारदार चोचीने तो इतर समुद्रपक्ष्यांना त्रास देतो. त्यांचे पंख ओढ किंवा तीक्ष्ण चोच त्यांच्या अंगात खुपस हे पक्षी हळूहळू जमिनीकडे येतात आणि त्यांच्या तोंडातून पडलेला अन्नाचा घास हे फ्रिगेटबर्ड बळकावतात.




जसे समुद्रचाचे असतात, तसे यांना आकाशातल्या चाचांची उपमा देतात.

**जोडीदाराची निवड :-**

प्रजननाच्या काळात नर फ्रिगेटबर्ड ग्रुपमध्ये एकत्र येतात. एकावेळी ३० एकजण असतात. (आकृती क्र. ५ पहा) आकृतीत दाखविल्याप्रमाणे नर आपल्या मानेजवळची लाल पिशवी एखाद्या मोठ्या फुग्याप्रमाणे फुगवतात. त्याला गुलार सॅक ती फुगवायला २० मिनीटांचा कालावधी लागतो. ही पिशवी त्यांच्या निमुळत्या, लांब चोचीखाली तांबट ह्दयाच्या आकाराची असते. अर्थातच मादीला आकर्षित करण्यासाठीच ही असते.

केवळ ही पिशवी फुगवून ते थांबत नाहीत. तर नर आपली चोच या पिशवीवर फिरवून आवाज काढतात. एक वेगळाच ड्रम वाजवल्यासारखा आवाज येतो. वर डोक्यावर जेव्हा मादी घिरट्या घालत असते. तेव्हां तर आपलं डोकं ही हलवतात, पंखाची हालचाल ही करतात आणि थोडसं किंचाळतात.

जेव्हा नराच्या शेजारी सुयोग्य अशी मादी येऊन थांबते. तेव्हा दोघेही एका तालात आपलं डोकं हलवतात. चोची एकमेकांत घालून खटखट आवाज करतात आणि गळ्यात गळा घालतात याचा अर्थ जोडीदाराची निवड होते.

**प्रजनन :-**

मादी छोटी झुडपं किंवा झाडांच्या माथ्यावर घरटं बांधते. घरट्याकरिता नर काटक्या गोळा करतो. मादी साधारण १ फुट रुंदीचं घरटं बनविते, त्याकरिता तिला १३ दिवस लागतात. मादी १ अंडे घालते. पहिले ३ महिने नर आणि मादी दोघेही काळजी घेतात आणि पिल्लाला अन्न पुरवतात. नर ३ महिन्यांतर निघून जातो. त्यानंतरचं एक वर्ष मादी त्या पिल्लाची काळजी घेते. पिल्लू अंड्यातून बाहेर आल्यापासून ४ ते ६ महिन्यांत उडायला शिकतं.

**आयुष्य कालावधी :-**

हे पक्षी दीर्घायुषी असतात. आत्तापर्यंत माहित असलेला मॅग्निफिसंट फ्रिगेटबर्ड १९ वर्षे ९ महिने वर्षाचा होता.

९३७२९१०३०६

# भारताची पहिली जनगणना



संदेश हजारे
शिरपूर-धुळे

१८७१ पासून दर दशकात भारतात होणाऱ्या जनगणनेच्या मालिकेतील १९४१ ची भारताची जनगणना ही ९ वी जनगणना होती.तर स्वातंत्र्यानंतर झालेली भारताची पहिलीच जनगणना होती.स्वतंत्र भारतातील पहिली जनगणना १९५१ साली झाली. प्रथमच स्वतंत्रपणे भारतीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या यंत्रणेमार्फत केल्या गेलेल्या या जनगणनेच्या उपक्रमाला ९ फेब्रुवारी, १९५१ रोजी सुरुवात करण्यात आली. केवळ शिरगणती न करता देशातील साक्षरता, पुरुष-स्त्री प्रमाण आदी अनेक गोष्टींचं सर्वेक्षणही सर्वप्रथमच करणारी ही जनगणना वैशिष्ट्यपूर्ण ठरली व देशाच्या नवउभारणीच्या दृष्टीने यातून मिळालेली आकडेवारी व माहिती मूलभूत आणि महत्त्वपूर्ण ठरली.स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात पहिली अधिकृत जनगणना १८८१ मध्ये झालेली होती. तेव्हापासून १९४१पर्यंत ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली भारताच्या जनगणना आयोजित केल्या गेल्या. स्वातंत्र्यानंतर १९५१ची जनगणना मात्र भारतीय अधिकारी व कर्मचारी यांच्या सहभागातून केली गेली. स्वातंत्र्यापूर्वी जनगणनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा होता, परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्याचं स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी योजना आखण्याच्या दृष्टीने १९५१च्या पहिल्या जनगणनेची आखणी केली गेली.ब्रिटिशांच्या राजवटीत प्रत्येक जनगणना करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपाची व्यवस्था केली जात असे. मात्र स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने कायमस्वरूपी व्यवस्था निर्माण करण्याचा निर्णय घेतला व केंद्रीय गृहखात्याच्या अंतर्गत जनगणना आयुक्तांची नेमणूक करण्यात आली. त्याचप्रमाणे ३ सप्टेंबर, १९४८ रोजी 'सेन्सस ॲक्ट' संमत करून घेतला व त्या कायद्यान्वये जनगणना करणाऱ्या अधिकाऱ्यांकडे व कर्मचाऱ्यांकडे विशिष्ट अधिकार सोपवले. या कायद्याद्वारे त्यांना नागरिकांच्या घरी, इमारतीत वा शेतात, आवारात जाऊन त्यांच्याकडून आवश्यक ती माहिती मिळवण्याचे अधिकार प्राप्त झाले. १९४९साली आर. ए. गोपालस्वामी यांची पहिले जनगणना आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यांच्याच नेतृत्वाखाली १९५१ची जनगणना पार पाडली गेली.३६ कोटींचा भारत : या जनगणनेमध्ये भारताची लोकसंख्या ३६ कोटी (३६,१०,८८,०९०) असल्याचं निष्पन्न झालं. स्त्रियांचं पुरुषांशी प्रमाण दरहजारी ९४६ असल्याचं नोंदवलं गेलं. १९५१ मध्ये भारतात फक्त १७ टक्के लोक साक्षर असल्याचं आणि फक्त १८ टक्के लोक शहरात राहत असल्याचंही स्पष्ट झालं. फाळणीनंतर भारतात एकूण ७४.८० लाख लोक स्थलांतरित झाले, त्यातील ४९.०५ लाख लोक पाकिस्तानातून, तर २५.७५ लाख लोक पूर्व पाकिस्तानातून आल्याचं नोंदवलं गेलं. या स्थलांतरामुळे हिंदूंचं प्रमाण १९४१ च्या तुलनेत ६९ टक्क्यांवरून ७५ टक्क्यांपर्यंत वाढल्याचं या जनगणनेतून निदर्शनास आलं. शहरी व ग्रामीण भागाची वर्गवारी पाहता एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ६ कोटी २४ लाखांवर लोक तेव्हा शहरी भागात राहत होते, तर सुमारे २९ कोटी ८६ लाखांवर भारतीय ग्रामीण भागात वास्तव्य करून होते...पहिल्या जनगणनेची ठळक वैशिष्ट्यं० एकूण लोकसंख्या : ३६ कोटी १० लाखशहरी भागातील जनसंख्या ६ कोटी २४ लाख० ग्रामीण भागातील जनसंख्या २९ कोटी ८६ लाखपुरुष-स्त्री प्रमाण १०००: ९४६साक्षरता प्रमाण : १७: स्थलांतरितांची संख्या : ७४.८० लाख.

दूर दूर माथ्यावर
उतरले निळे मेघ
खोल खोल दरीतले
मिटले ग खोलपण

झाकोळले ओले नभ
बरसते दिसभर
शहारते ओले रान
झळाळते नवेपण

टिपटीप तळ्यातमध्ये
थेंबथेंब नाचणारे
तरंगात हिरवेकंच
प्रतिबिंब शहारते

हिरव्या मऊ माळरानी
चिंब कोवळ्या पानोपानी
आभाळाचे गुज गात
मनोमनी ओली गाणी

चकाकते थेंब थेंब
जपलेले जागोजाग
सुटूनिया जाते काही
कसली ही हुरहुर

तळ्यातल्या पाण्यावर
थिरकते निळे मन
खळाळत्या झऱ्यासवे
गेले गेले दूर दूर

हरवले हिरव्यात
झुरणारे निळेपण
प्रकाशले दूरवर
झुकलेले निळे नभ...

नी.अ.श्रीराम

शिक्षणयात्री

# लेखकांसाठी सुचना

१. लेखांचा विषय प्रचलित आणि संक्षिप्त असणे आवश्यक आहे.

२. प्रकाशित करणाऱ्या येणाऱ्या लेखांची शब्दमर्यादा ५०० ते १००० असावी आणि लेख संगणकीकृत करून shikshanyatri11@gmail.com, pragatiartsshirpur@gmail.com या मेलवर पाठवावी.

३. संगणकीकृत केलेल्या मुद्रित अक्षरांसाठी (श्रीलिपी देव ७०८) Shree lipi- Dev708 /google marathi/ mangal font फॉन्ट साईज १५ असावे.

४. स्वीकृत करण्यात येणाऱ्या लेखांचे पुनर्संस्कारित करण्याचे सर्व हक्क संपादक मंडळाकडे राहतील.

५. लेखात अद्यावत माहिताचा वापर करून भाषा सुस्पष्ट व समजण्यास सोपी असावी.

६.लेखकाने प्रथम पृथ्वावर लेखाचे शीर्षक, लेखकाचे नाव, पासपोर्ट साईज फोटो, भ्रमणध्वनी व पिनकोडसह पत्ता अवश्य द्यावा.

७. लेख पाठवितांना लेखकांकडून अनेकवेळा टंकलेखनामध्ये चुका होत असल्याचे आढळते, त्यामुळे वाक्यांचा संदर्भ लागत नाही. तरी कृपया लेख पाठवितांना पुन्हा एकदा काळजीपूर्वक वाचन करून पाठवावा.

८. मासिकाच्या वर्गणीचे धनादेश व डिमांड ड्राफ्ट - शिक्षणयात्री या नावाने संपर्क पत्त्यावर पाठवावेत.

**संपर्क** :शिक्षणयात्री शैलनंद,प्लॉट नं.५२ पार्वती कॉलनी,शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे 8208301001shikshanyatri11@gmail.com

Reg No. MAHMAR2015/67226

शिक्षणयात्री

Postal Registration No.DHL/557/2021-23











# सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ४०० रूपये　　द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये　　त्रैवार्षिक वर्गणी-१००० रूपये

ई अंक (फक्त पी.डी.एफ.) व्दिवार्षिक वर्गणी - ५००

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

With pay any app

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री

शैलनंद,प्लॉट नं.५२ शिवपार्वती कॉलनी करवंद नाका शिरपूर ता.शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)


Postal Registration No.DHL/557/2021-23

संपादक - शिक्षण यात्री
शैलनंद,प्लॉट नं.५२ पार्वती कॉलनी,
करवंद नाका,शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
४२५४०५

Pragati Arts Shirpur 8421356261

प्रती, ..................................................

..................................................

..................................................